14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक


सिटी न्यूज सुपरफास्ट


अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३२ ■ गुरूवार, दि. ११ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# लोकसभेच्या जागा 824 पर्यंत वाढवा !

## ▶▶170 मतदारसंघांच्या विभाजनाचा प्रस्ताव ▶▶पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेची शिफारस





### मोठ्या राज्यांच्या जागा ५० टक्के वाढवा

लोकसभेच्या जागा वाढवताना मोठ्या राज्यांच्या जागा ५० टक्के वाढवल्या जाव्यात. नवीन मॉडेलनुसार सर्व मोठ्या राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये ५० टक्के वाढ होणार आहे. केरळच्या जागा २० वरून ३०, तामिळनाडूच्या ३९ वरून ५९, तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून थेट १२० होणार आहे. तर, लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जागा दुप्पट करण्याची शिफारस केली गेलीय.

### २०२७ च्या जनगणनेचा आधार घ्यावा

हा अभ्यास २०११ च्या जनगणनेवर आधारित आहे. त्यामुळे अधिक अचूक आणि विश्वासार्ह पुनर्रचनेसाठी निवडणूक आयोग आणि सरकारने २०२७ च्या जनगणनेच्या आकडेवारीचा वापर करावा, अशी शिफारस या परिषदेने केली आहे.

### महिला मतदारांवर विशेष लक्ष

अहवालात नमूद करण्यात आले आहे की, मतदारसंघांचे विभाजन केल्यानंतरही शहरी भागांत महिलांच्या मतदानाचा टक्का कमी राहतो. हे आव्हान पेलण्यासाठी निवडणूक आयोगाने केवळ महिलांसाठी मतदान केंद्र तयार करणे आणि महिला-लक्ष्यित मतदार नोंदणी मोहिमा राबवणे आवश्यक आहे. जेणेकरून महिलांची मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होऊ शकेल, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

वृत्तसंस्था ११ जून

**नवी दिल्ली :** पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने लोकसभेची सदस्यसंख्या ८२४ जागांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. केवळ लोकसंख्येचा विचार न करता मतदारसंघ दोन किंवा तीन भागांत विभागण्यासाठी बहु-घटकीय निकषांचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तसेच बहु-घटकीय निकषांचा वापर करून मतदारसंघांचे विभाजन केले जावे, अशी शिफारस करण्यात आली आहे.

२००९ ते २०२४ दरम्यानच्या लोकसभा निवडणुकांच्या डेटाचा अभ्यास करून हा अहवाल तयार करण्यात आला आहे. लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता मतदानाचा टक्का, मतदारसंघाचा आकार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची लोकसंख्या, भाषिक विविधता आणि ध्रुवीकरण यांसारख्या बहु-घटकीय निकषांचा वापर करून मतदारसंघांचे विभाजन केले जावे.

विद्यमान ५४३ जागांपैकी एकूण १७० मतदारसंघांचे विभाजन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यातील ५९ मतदारसंघांचे दोन भागांत तर १११ मतदारसंघांचे तीन भागांत विभाजन सुचवले आहे.

लोकसभेच्या जागा वाढवताना मोठ्या राज्यांच्या जागा ५० टक्के वाढवल्या जाव्यात. नवीन मॉडेलनुसार सर्व मोठ्या राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये ५० टक्के वाढ होणार आहे. केरळच्या जागा २० वरून ३०, तामिळनाडूच्या ३९ वरून ५९, तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून थेट १२० होणार आहे. तर, लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जागा दुप्पट करण्याची शिफारस केली गेलीय.

मिझोराम, पुदुचेरी, सिक्कीम, लडाख, अंदमान आणि निकोबार, नागालँड, चंदिगढ आणि लक्षद्वीप यांसारख्या लहान राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील जागा दुप्पट करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या मॉडेलनुसार दक्षिण भारतातील राज्यांचा (तेलंगणा, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू) लोकसभेतील वाटा २३.६ टक्के राहील (जो सध्या २३.७ टक्के आहे). तर उत्तर भारतातील ६ सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांचा (राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, बिहार आणि महाराष्ट्र) वाटा ४५.२ टक्के होईल (जो सध्या ४५.६ टक्के आहे). यामुळे दोन्ही भागांतील जागांचे संतुलन कायम राखण्यास मदत होईल. तसेच मतदारसंघांचे योग्य विभाजन केल्यास आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत २.३ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.

लेकाच्या पहिल्या वाढदिवसाआधीच...

# वडिलांवर काळाचा घाला; दोन जवानांना वीरमरण

वृत्तसंस्था ११ जून

**बारामुल्ला :** जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरमधून महाराष्ट्राला हादरवून टाकणारी आणि दुःखद बातमी समोर आली आहे. उरीमधील एका लष्करी तळावर झालेल्या दुर्दैवी हँड ग्रेनेड स्फोटात महाराष्ट्राच्या दोन धाडसी जवानांना वीरमरण आले आहे. अर्जुन जाधव आणि विक्रम बाळकृष्ण चव्हाण अशी या शहीद वीरांची नावे असून, ते दोघेही '८ राष्ट्रीय रायफल्स'मध्ये कार्यरत होते. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे.

शहीद अर्जुन जाधव हे साताऱ्याचे, तर विक्रम चव्हाण हे नवी मुंबईतील ऐरोलीचे रहिवासी होते. ही हृदयद्रावक घटना उरीतील कमलकोट येथील एका लष्करी छावणीत सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. लष्कराच्या छावणीत शस्त्रास्त्रे हस्तांतरित करण्याची आणि ती तपासण्याची नियमित प्रक्रिया सुरू होती. याच दरम्यान अचानक एका हँड ग्रेनेडचा चुकून भीषण स्फोट झाला. या स्फोटाच्या तीव्रतेमुळे जवान अर्जुन जाधव आणि विक्रम चव्हाण हे दोघेही गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर लष्कराने तातडीने सूत्रे हलवून दोन्ही जखमी जवानांना हवाई दलाच्या विमानाने श्रीनगरच्या बदामीबाग कॅन्टोन्मेंटमधील लष्करी रुग्णालयात दाखल केले. मात्र, दुर्दैवाने उपचारांपूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. हा स्फोट नेमका तांत्रिक बिघाडामुळे झाला की इतर काही कारणांमुळे, याचा शोध घेण्यासाठी लष्कराकडून कोर्ट ऑफ इन्क्वायरी म्हणजेच कायदेशीर चौकशी सुरू करण्यात आली आहे.या संपूर्ण घटनेत साताऱ्याच्या कराड तालुक्यातील शहापूर गावचे सुपुत्र अर्जुन जाधव यांची कहाणी ऐकून कोणाच्याही डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. अर्जुन हे लष्कराच्या 'बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप'चे जवान होते. त्यांच्या डोक्यात सध्या एकच विचार घोळत होता, तो म्हणजे आपल्या पोटच्या लाडक्या लेकाचा पहिला वाढदिवस. येत्या २५ जून रोजी त्यांच्या मुलाचा पहिला वाढदिवस होता. एकुलत्या एका मुलाचा पहिला वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्यासाठी त्यांनी मनात अनेक स्वप्ने आखली होती आणि त्याची तयारीही सुरू केली होती.

# पंतप्रधान मोदी अन् अभिजीत दीपकेंची अमेरिकेत गुप्त भेट!

प्रतिनिधी ११ जून

**मुंबई :** कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके आणि मोदींची अमेरिकेत बैठक झाली असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. अभिजीत दीपके आणि मोदी यांच्या भेटीचे फोटो मला एकाने पाठवले, असेही त्यांनी सांगितले. मोदींच्या भेटीनंतरच दीपके भारतात आल्याचेही संजय राऊत यांनी म्हटले आहे. राऊत यांच्या या दाव्याने चर्चेला उधाण आले आहे.

अभिजीत दीपके यांनी अमेरिकेतून भारतात परतल्यानंतर पहिल्यांदा दिल्लीमध्ये जंतर मंतरवर आंदोलन केल्यानंतर आज पुण्यामध्ये त्यांच आंदोलन होत आहे, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन केले जात आहे, या सगळ्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टी चर्चा सुरू असताना आता संजय राऊत यांनी हा मोठा दावा केलेला आहे, अमेरिकेमध्ये मोदी आणि दीपके यांच्या भेटीच्या दाव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. अभिजीत दिपके आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अमेरिकेत जी मीटिंग झाली त्याचे फोटो एकाने पाठवले आहेत. त्याच्यानंतर दिपके भारतात आले, अशी माहिती काही लोकांनी सांगितली. मी हे आरोप करत नाही, माझी माहिती लोकांनी पोहोचवलेली आहे, ती मी सांगत आहे, आम्ही त्यांच्या भूमिकेला समर्थन दिलं, मात्र जेव्हा काही माहिती या सगळ्या संदर्भात समोर येते, तेव्हा माध्यमांसमोर मांडणे आवश्यक आहे.



### मोदी कुठे इलेक्टेड प्रायमिनिस्टर आहेत?

नरेंद्र मोदी यांचे खरे पंतप्रधान पद हे २०१४ ते २०१९ लोकांनी निवडून दिलेले आहे. त्यानंतर चोरलेल्या निवडणुकीतून ते पंतप्रधान झालेले आहेत. २०१४ मध्ये लोकांनी त्यांना निवडून दिले. त्यानंतरच्या दोन्ही निवडणुकीत जनतेने पराभूत केलेले असताना निवडणूक आयोग, सुप्रीम कोर्ट, ईडीचा वापर या माध्यमातून ते निवडून आले. गेल्या निवडणुकीत २०२४ मध्ये ते निवडून आलेलेच नाही. ते कुठे इलेक्टेड प्रायमिनिस्टर आहेत? असा टोला राऊतांनी लगावला. निवडणूक यंत्रणा आणि प्रशासनात घोटाळा करून जिंकल्या आहेत, पक्ष फोडा तुरुंगात टाका हे काम मोदी यांनी केले, असा घणाघातही खा. संजय राऊत यांनी प्रत्यक्ष पंतप्रधानांवर केला आहे.

# रिझर्व्ह बँकेचा मोठा निर्णय...!

प्रतिनिधी ११ जून

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेच्या एका नव्या निर्णयामुळे सहकार क्षेत्रातील दिग्गजांच्या मक्तेदारीला मोठा धक्का बसणार आहे. जिल्हा सहकारी बँक आणि नागरी सहकारी बँकेतील संचालक मंडळात सलग दहा वर्ष असलेल्यांनी किमान तीन वर्ष संचालक मंडळातून बाहेर बसावे, असे फर्मान आरबीआयने काढले आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. राज्यातील नागरी सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळात सलग दहा वर्ष संचालक म्हणून असलेल्यांसाठी ही चिंतेची बातमी मानली जात आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने 'सलग दहा वर्ष संचालक मंडळात असलेल्या संचालकांनी तीन वर्षांसाठी संचालक मंडळातून बाहेर बसावे', असा परिपत्रक जारी केले आहे. त्यामुळे राज्यभरातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि सुमारे ४३४ नागरी सहकारी बँकेमधील किमान ६००० (सहा हजार) संचालकांवर घरी बसण्याची वेळ येणार आहे.

# आई व मुलाचा बुडून मृत्यू...!

प्रतिनिधी ११ जून

**अकोला:** मूर्तिजापूर तालुक्यातील समशेरपुर गावात आज सकाळी अत्यंत दु:खद घटना घडली. गावातील तीन महिला व एक लहान मुलगा काटेपूर्णा नदीत अंघोळ करायला गेले असता पाण्याचा अंदाज न आल्याने आई व मुलगा यांचा नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मूर्तिजापूर तालुक्यातील समशेरपूर गावात आज सकाळी ६ च्या सुमारास ३ महिला व एक लहान मुलगा काटेपूर्णा नदी मध्ये अंघोळ करायला गेले होते. अंघोळ करतांना त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ३ महिला व एक मुलगा अचानक पाण्यात बोडले, घटनेची माहिती गावकऱ्यांना मिळताच त्यांनी तात्काळ काटेपूर्णा नदी काठी पोहचून माधुरी उमेश खोत व मीरा श्यासुंदर चौधरी या दोन महिलांना वाचविण्या यश आले परंतु त्यापैकी वृषाली हरिदास खोत व त्यांचा मुलगा स्वराज हरिदास खोत यांचा नदिच्या पाण्यात बुडुन मृत्यु झाला आहे. या घटनेमुळे समशेरपूर गावा सह संपूर्ण तालुक्यात व्यक्त होत आहे. या घटने मध्ये दुर्दैवी मृत्यू झालेल्या आई व मुलाचे शव मुर्तीजापुर येथील शवविच्छेदन गृहात पाठविण्यात आली असून माधुरी उमेश खोत व मीरा श्यासुंदर चौधरी या दोन महिलांवर अकोला जिल्या सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. यावेळी वंदे मातरम बचाव पथक कुरणखेड व समशेरपूर गावातील नागरिकांनी सहकार्य केले.

# शाळा 15, 22 जूनला नव्हे तर 30 जूनलाच सुरू होणार!

## सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण विभागाचा निर्णय ठरवला अवैध, न्यायालयांच्या आदेशाकडे शिक्षण संचालकांचे दुर्लक्षाबाबत नाराजी

प्रतिनिधी ११ जून

**नागपूर :** न्यायालयाने विदर्भातील तापमान, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि यापूर्वीचे न्यायालयीन आदेश लक्षात घेत २३ एप्रिल २०२३ रोजीचा शासननिर्णय अंतिम ठरविला. त्यानुसार शाळा ३० जून व त्यादिवशी सुटी असल्यास त्यानंतरच्या शासकीय कामकाजाच्या दिवशीच सुरू कराव्यात, असे स्पष्ट केले. तसेच आजवरच्या न्यायालयांच्या आदेशांकडे शिक्षण संचालकांकडून दुर्लक्ष झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

विदर्भातील शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचा राज्यशासनाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी रद्द ठरविला. यासोबतच न्यायालयीन सुनावणी सुरू असताना शिक्षण संचालकांनी ९ जून रोजी काढलेले २२ जूनपासून शाळा सुरू करण्याचे पत्रही न्यायालयाने अवैध ठरवत रद्द केले.

### ...तर शिक्षण संचालकांवरच कारवाई होईल!

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि शासननिर्णय अस्तित्वात असताना शिक्षण संचालकांनी स्वतंत्र पत्र काढणे योग्य नसल्याचेही खंडपीठाने नमूद केले. तसेच भविष्यात विदर्भातील शाळा सुरू करण्याच्या निर्णयात बदल करू नयेत व तसे झाल्यास पुढील वेळेस संचालकांवर अवमान कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला.

त्यामुळे आता २० एप्रिल २०२३च्या शासननिर्णयानुसार विदर्भातील शाळा ३० जूनपासूनच सुरू कराव्या लागणार आहेत, असे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर बुधवारी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मंगळवारी झालेल्या सुनावणीत खंडपीठाने राज्य शासनाला, २००७ मधील न्यायालयीन निर्णय अस्तित्वात असताना विदर्भातील शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा तोंडी प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर राज्य सरकारने ९ जून रोजी संध्याकाळी नवे परिपत्रक काढत 'विदर्भातील शाळा २२ जूनपासून सुरू व्हाव्यात' असे या परिपत्रक काढले.







CMYK

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एका कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळी प्रकरणात निर्णय देतांना अस विधान केलं की, 'देशाचा कायदा आता सून लेकींच्या सन्मानाचं रक्षण करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.' याबद्दल न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांचे हार्दिक अभिनंदन. कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळीच्या प्रकरणात आरोपींना शिक्षा मिळालीच पाहिजे अशी भूमिका घेऊन खरं म्हणजे न्यायमूर्तींनी कायद्यातील तरतुदींचे पालन केले आहे. कारण अलिकडे कौटुंबिक हिंसाचार व हुंडा बळी प्रकरणात कायद्यातील तरतुदींपेक्षा न्यायमूर्तींची मते प्रभावी ठरत असून अनेक न्यायालयीन निर्णयात कायद्याची अवहेलना केल्या गेल्याची उदाहरणे आहेत. म्हणून सून लेकींच्या सन्मानाचं रक्षण करण्यासाठी कायदा जरी सज्ज असला तरी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा सज्ज आहेत का? हा गंभीर प्रश्न आहे.

देशात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी निर्माण केलेली पोलिस यंत्रणा ही कायद्याची रक्षक म्हणून काम करणारी प्राथमिक यंत्रणा आहे. पण या यंत्रणेत भ्रष्टाचार वाढल्यामुळे कायदा व सुव्यस्था ढासळली असून दिवसेंदिवस सर्वच क्षेत्रातील गुन्हेगारीत वाढ होत आहे. त्यामुळे स्त्रिया, लहान मुलेमुली, सामान्य माणूस यांचे जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य धोक्यात आले असून सामाजिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे.

# कायदा सज्ज पण यंत्रणांचं काय...?

कौटुंबिक हिंसाचार प्रकरणांमध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद झाली असून घरगुती वादाच्या व हिंसाचाराच्या घटनांचे त्यांना गांभीर्य राहिले नाही. त्यामुळे अनेकदा एफ.आय.आर. नोंदवण्याऐवजी ती केवळ अदखलपात्र तक्रार म्हणून नोंदवतात किंवा त्यांना 'कौटुंबिक वाद' किंवा 'दिवाणी प्रकरणे' ठरवून गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ करतात. बऱ्याच वेळा पोलिस आरोपींकडून पैसे घेऊन एफ. आय. आर. नोंदवित नाहीत किंवा त्यातून काही लोकांची नावे वगळतात, जर गुन्हेगारांचा राजकीय किंवा सामाजिक प्रभाव असेल तर पोलीस तक्रार नोंदवून घेण्यास मागेपुढे पाहतात किंवा चौकशीच्या नावाखाली विलंब करतात. 'ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार'या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, दखलपात्र गुन्हा असल्यास प्राथमिक चौकशी न करता थेट एफ.आय.आर. नोंदवणे बंधनकारक आहे, तरीही पोलिस सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न करता अनेकदा चौकशीच्या नावाखाली एफ.आय.आर. नोंदविण्यास टाळाटाळ करतात हे आजचे वास्तव आहे.

**न्यायव्यवस्था :** भारतीय संविधानाचे व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारी न्यायव्यवस्था कायद्याची सर्वोच्च रक्षक मानली जाते. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या किंवा कायदा हातात घेऊन गुन्हा करणाऱ्या लोकांना मग ते कोणीही असो कायदेशीर तरतुदींनुसार शिक्षा करण्याचा अधिकार न्यायालयांना आहे. त्यामुळेच अन्यायग्रस्त लोकं अंतिम न्यायासाठी मोठ्या आशेने न्यायालयात जातात. अलिकडे समाजात कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळी प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे पिडित स्त्रिया आपल्यावरील अत्याचाराविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५ च्या तरतुदीनुसार न्यायालयात खटले दाखल करतात. मात्र बऱ्याच वेळा घडलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पुरावे इत्यादी कारणांवरून कोर्ट आरोपींना कायद्यातील तरतुदींप्रमाणे शिक्षा करत नाहीत. बहुतेक प्रकरणात गुन्हेगारांना जामीन मिळतो तर मोठ्या प्रमाणात गुन्हेगार निर्दोष सोडले जातात. स्त्रियांवर होणारा कौटुंबिक हिंसाचार शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक स्वरूपाचा असतो व तो घराच्या चार भिंतींच्या आत होत असतो. न्यायालयात फिर्यादी व आरोपी दोन्ही पक्षांना आपापली भूमिका मांडण्याची संधी असते. कारण निर्दोष व्यक्तीला शिक्षा होऊ नये हे तत्त्व पाळले जाते. त्यामुळे दोन्ही पक्ष आपली बाजू मांडण्यासाठी वकिलांची नियुक्ती करतात. आपला समाज कितीही शिक्षित, आधुनिक व प्रगत झाला असला तरी समाजाची मानसिकता बदललेली नाही. त्यामुळे काही सन्माननीय अपवाद वगळता कुटुंबात सुनांचा छळ होतो हे सामाजिक वास्तव आहे. त्यामुळेच तर सरकारला स्त्रियांच्या संरक्षणार्थ विविध कायदे करावे लागत आहेत.

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, २००५ आणि अलिकडे भारतीय न्याय संहिता, २०२३ मध्ये स्त्रियांच्या संरक्षणार्थ अनेक कडक तरतुदी केल्या गेल्यात पण तरीही महिलांवरील अन्याय, अत्याचार व हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे ही बाब कायद्याच्या यंत्रणांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात पोलिस किंवा न्यायालये बहुधा फक्त शारीरिक हिंसाचार म्हणजे मारहाणीच्या जखमा, वैद्यकीय तपासणी अहवाल इत्यादी पाहूनच निर्णय देतात. पण स्त्रियांचा कुटुंबात होणारा छळ हा फक्त शारीरिक नसतो तर मानसिक, आर्थिक व भावनिक स्वरूपाचा देखील असतो. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम ३ नुसार, कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या देखील व्यापक आहे. कायदा म्हणतो, 'जर पती, कुटुंबातील इतर सदस्य किंवा लिव्ह-इन पार्टनर यांचे कोणतेही कृत्य महिलेच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला, सुरक्षिततेला, आयुष्याला किंवा कल्याणाला बाधा पोहोचवणारे असेल किंवा धोका निर्माण करत असेल, तर त्या कृत्याला 'कौटुंबिक हिंसाचार' मानले जाते.'

म्हणजे कायद्यामध्ये स्त्रियांचे शारीरिक शोषण उदाहरणार्थ महिलेला मारहाण करणे, शारीरिक वेदना देणे, जीवे मारण्याची धमकी देणे, तिचे कोणतेही शारीरिक नुकसान करणे. लैंगिक शोषण म्हणजे बळजबरीने शारीरिक संबंध ठेवणे, लैंगिकतेचा गैरवापर करणे किंवा महिलेच्या सन्मानाला ठेच पोहोचवणारे कोणतेही लैंगिक कृत्य करणे. शाब्दिक आणि भावनिक शोषण म्हणजे, सतत अपमान करणे, शिवीगाळ करणे, चारित्र्यावर संशय घेणे, मुलांविषयी किंवा मुलगा होत नाही म्हणून टोमणे मारणे, धमक्या देणे किंवा मानसिक त्रास देणे. आर्थिक शोषण म्हणजे महिलेला किंवा तिच्या मुलाला मूलभूत गरजांसाठी लागणारा खर्च न देणे, तिची स्वतःची मालमत्ता बळकावणे, तिला स्वतःच्या घरात किंवा नोकरीच्या ठिकाणी जाण्यापासून रोखणे आणि हुंडाबळी म्हणजे हुंड्यासाठी किंवा तत्सम मौल्यवान वस्तूंच्या बेकायदेशीर मागणीसाठी महिलेचा छळ करणे किंवा त्रास देणे इत्यादींचा समावेश केलेला आहे.' कायद्याने केलेल्या हिंसाचाराच्या व्याख्येची व्यापकता लक्षात घेतली तर

कुटुंबातील प्रत्येक स्त्री हिंसाचाराची बळी ठरलेली आहे. म्हणून जर खरोखर स्त्रियांवरील हिंसाचाराला प्रतिबंध घातला जावा आणि पिडित स्त्रीयांना न्याय मिळावा ही प्रामाणिक भावना कायद्याच्या यंत्रणांमध्ये असेल तर कायद्याची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक तर आहेच पण 'कायदा लेकी सुनांचा सन्मान करण्यासाठी सज्ज आहे' असे म्हणण्याला खरा अर्थ आहे.

प्रा.डॉ.एम.आर.इंगळे
विभागीय सचिव डाटा अकोला

## ग्राम मधापुरी येथे गावठी हातभट्टी दारू अड्डयांवर कारवाई



**मुर्तिजापूर :** ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत माना पोलीसांनी अवैध दारू निर्मितीविरोधात प्रभावी कारवाई केली.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन माना येथील पथकाने ग्राम मधापुरी शेतशिवारात मारोती जानराव सोळंके (वय ५५ वर्षे, रा. मधापुरी ता. मुर्तिजापूर, जि. अकोला) याच्या ताब्यातून १० लिटर गावठी हातभट्टी दारू किंमत २,००० /- रुपये व ३४० लिटर सडवा मोहमाश किंमत ६८,०००/- रुपये असा एकूण ७०,००० /- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. सदर प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी प्रतिबंधक अधिनियम अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी उपविभाग वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मानाचे

ठाणेदार गणेश नावकार, पो. हवालदार प्रफुल्ल भड, उमेश हरमकर, पो. कॉ. आकाश काळे व चा. पो. कॉ. नंदकिशोर हिरळकर यांनी केली.

## माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या जिल्हा प्रचार प्रमुखपदी देवानंद निशाणराव

**अकोला :** माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या अकोला जिल्हा प्रचार प्रमुखपदी देवानंद भीमराव निशाणराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर केली आहे.

नियुक्तीपत्रानुसार, हे पद मानद स्वरूपाचे असून भारतीय संविधान, भारतीय कायदे तसेच फेडरेशनच्या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ चा व्यापक जनहितासाठी प्रभावी वापर करणे, सर्वसामान्य नागरिकांमध्ये या कायद्याबाबत जनजागृती करणे आणि त्याचा प्रसार-प्रचार वाढविणे, अशी महत्त्वाची जबाबदारी निशाणराव यांच्यावर सोपविण्यात आली आहे. माहिती अधिकार



कार्यकर्ता फेडरेशनचे मुख्यालय नवीन पनवेल येथे आहे.

'वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला पूर्णपणे जागून आगामी काळात जिल्हाभरात संघटनेची ध्येयधोरणे आणि विचार सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रचार यंत्रणा अधिक मजबूत करण्यावर माझा भर असेल,' अशी प्रतिक्रिया नवनियुक्त जिल्हा प्रचार प्रमुख देवानंद निशाणराव यांनी यावेळी व्यक्त केली.

## अधिक मास समाप्ती जवळ आली प्रवाशांची गर्दी वाढली



**हिवरखेड :** येथील बसस्थानकावर महामंडळच्या एस टी बसची प्रवाशी आतुरतेने वाट पाहतात.

बस येताच बसवर चढण्यासाठी घाई गर्दी करतानाचे हे चित्र हिवरखेड बसस्थांकावर पाहण्यास मिळते.

अधिक मासची गर्दी देव दर्शनासाठी व विवाहित लेकीबाईची माहेरी येण्याची गर्दी, शाळा जवळ आली मामाच्या घरून आपल्या घरी पोरांची जाण्याची घाई , व दैनंदिन कामगार,व्यापारी यांची जाण्या येण्याची घाई, अशा अलोट गर्दीचे दर्शन हिवरखेड येथेच नव्हे तर अनेक बसस्थानकवर दिसून येते, अधिक मासात नवीन वस्तू खरेदी करणे, दान धर्म करणे,गोड जेवण बनविणे अशा या अधिक अधिक मासात आपुलकी जिव्हाळा सुद्धा घडून येतो.

## दिन विशेष

## साने गुरूजी गांधीवादी शिक्षक, समाजसुधारक अन् प्रतिभावंत लेखक!



पांडुरंग सदाशिव साने यांचा आज स्मृतिदिन

साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक होते. साने गुरुजींचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी २४ डिसेंबर १८९९ रोजी झाला. त्या ठिकाणी त्यांचे वडील कोर्टाचे काम करीत असत. कोर्टाचे घराणे साधारणतः वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होती ही. पण त्यांच्या वडिलांच्या, सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रितीने बडे घर पण पोकळ वासा अशी दयनीय अवस्था होती. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यांनी मराठी आणि संस्कृत साहित्यामध्ये एम. ए. ही उच्च पदवी मिळवली होती.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. १९२८ साली त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. १९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी 'मैला वाहणे' व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली.

'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून साने गुरुजीच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील 'बलसागर भारत होवो' सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला.सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी १९४६ च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला महात्मा गांधींचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तो शेवटपर्यंत मिळाला नाही. अखेर साने गुरुजींनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. 'एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले,' असे त्या वेळी म्हणले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असे या चळवळीत अभिप्रेत होते. ते स्वतः तमिळ, बंगाली आदी भाषा शिकले होते. १९४८ मध्ये त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसतात. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे-रचित गीता प्रवचने सुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लुवर नावाच्या कवीच्या 'कुरल' नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. फ्रेंच भाषेतील कादंबरीचे 'दुःखी' या नावाने मराठीत अनुवादन केले.

## अडगांव बु. परिसरात बागायती पऱ्हाटी पेरणीला प्रारंभ

प्रतिनिधी ११ जून

**अडगांव बु. :** आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाच्या शेतशिवारात अखेर खरिपाची लगबग सुरू झाली आहे. परिसरातील शेतशिवारात बागायती पऱ्हाटी पेरणीला सुरुवात झाली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची खात्रीशीर सोय आहे, असे शेतकरी उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन एक, दोन एकरांपर्यंत जमेल तेवढ्या क्षेत्रावर पऱ्हाटीची लागवड करत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.



दुसरीकडे, यंदाच्या खरीप हंगामाला महागाईचे मोठे ग्रहण लागले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत रासायनिक खते, कपाशीचे बी-बियाणे, मशागतीचा खर्च आणि लागवडीची मजुरी यात प्रचंड वाढ झाली आहे. शेतीचा प्रत्येक खर्च महागला असताना, दुसरीकडे हंगामाच्या शेवटी पिकाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. उत्पादन खर्च आणि मिळणारा भाव यांचा ताळमेळ लागत नसतानाह अनेक शेतकरी कर्ज आणि उधार-पाधार करून कपाशीची पेरणी करत आहेत.

सध्या परिसरात पऱ्हाटी लागवडीसाठी मजूर टंचाई तीव्रतेने जाणवत आहे. महिला मजूर १ पाकीट लागवडीचे २५० रुपये घेत आहेत, तर हाताच्या चरका मशीनच्या साहाय्याने २०० रु असा दर सुरू आहे. पैसे मोजण्याची तयारी असूनही वेळेवर मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना महीला मजुरांसाठी ताटकळत राहावे लागत आहे.

एकीकडे बागायती क्षेत्रावर लागवड सुरू असताना, दुसरीकडे कोरडवाहू शेतकरीही मागे राहिलेले नाहीत. महागडे बी-बियाणे आणि खतांची खरेदी करून कोरडवाहू शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाले आहेत. आता त्यांची नजर आभाळाकडे लागली असून, केवळ दमदार पावसाची प्रतीक्षा शेतकरी करत आहेत. परिसरात लवकरच चांगला पाऊस होऊन पेरण्यांना गती मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

## हिवरखेड ठाणेदार पदी सचिन पाटील रुजू



**हिवरखेड :** या गावच्या पोलिस स्टेशनवर आजुबाजूच्या अनेक खेड्यापाड्यांचा भार अवलंबून आहे. यापूर्वी ठाणेदार गजानन राठोड यांनी या पोलिस स्टेशनचा कारभार सांभळला होता, त्यांनी आपले कर्तव्य कामगिरि योग्य रित्या पार पाडले. १० जूनला एसपी चांडक यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. तर हिवरखेड पोलिस स्टेशनला ठाणेदार सचिन पाटील हे रुजू झाले. या स्टेशनचा कारभार हाती घेतला. ठाणेदार पाटील कशा प्रकारे आपले कर्तव्य पार पाडतात याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## जीएमसीच्या वार्ड क्रं. ३२ मध्ये भरती अनोळखी रुग्णाचे नातेवाईक मिळाले



प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** १४ मे पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात वार्ड क्रमांक ३२ मध्ये एक अनोळखी पुरुष रुग्णावर मेडिसिन विभाग अंतर्गत उपचार सुरु आहेत. रुग्णाचे नाव ओमराज आप्पासाहेब पवार असून राहणार बाणाईत, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ असे आहे. या रूग्णाला त्याचे नातेवाईक अखेर भेटले. रुग्णाचा मोठा भाऊ ओमकार पवार हे रुग्णाला दीड महिन्यापासून शोधत होते. त्यांनी माध्यमात प्रसारित अनोळखी रुग्णाची ओळख पटवण्याची बातमी वाचून समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे यांच्याशी मोबाईलवर संपर्क केला. सदर नातेवाईकांचा शोध कार्यामध्ये सर्वोपचार रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे यांनी नातेवाईकाना रुग्णाविषयी संपूर्ण माहिती दिली आणि रुग्णालयामध्ये येण्यासाठी प्रयत्न केले आणि रुग्णाचे मोठे भाऊ रुग्णाला भेटण्यासाठी आज रुग्णालयात दाखल झाले. रुग्णाला पाहून त्यांना आनंद झाला आणि अश्रू अनावर झाले. अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक डॉ.प्रवीण सपकाळ यांच्या मेडिसिन विभागाचे विभाग प्रमुख डॉ.मुकुंद अष्टपुत्रे, डॉ.सुनीता आडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत.

## अडगाव बु. व शिवाजीनगर ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर

प्रतिनिधी ११ जून

**अडगाव बु.:** अडगाव बु. तेल्हारा तालुक्यातील मुदत संपलेल्या ३३ ग्रामपंचायतींच्या प्रभाग निहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज प्रशासनाच्या वतीने पार पडला. यामध्ये अडगांव बु आणि शिवाजीनगर ग्रामपंचायतीच्या आरक्षणाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या नव्या आरक्षण सोडतीमुळे अनेक प्रभागांत महिलांना मोठी संधी मिळाल्याने निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या दिग्गज पुरुष उमेदवारांचे राजकीय गणित बिघडले असून त्यांना मोठा धक्का बसला आहे.

**अडगाव बु. ग्रामपंचायतीच्या एकूण ६ प्रभागांमधील आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे:** प्रभाग क्र. १ ओबीसी महिला, खुला सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण , प्रभाग क्र. २ ओबीसी जनरल , खुला महिला, सर्वसाधारण, प्रभाग क्र. ३ एस.टी. महिला, ओबीसी जनरल, खुला जनरल, प्रभाग क्र. ४ ओबीसी महिला, खुला जनरल, प्रभाग क्र. ५ एस.सी. महिला, खुला महिला, खुला जनरल, प्रभाग क्र. ६ एस.सी. जनरल, खुला महिला, खुला महिला, या प्रकारे सोडत काढण्यात आली. सदर प्रक्रियेसाठी महसूल विभागाचे मंडल अधिकारी सुधाकर सोनवणे, तलाठी प्रवीण देशमुख, ग्रामसेवक अनिल खुमकर यासह प्रशासकीय समिती अध्यक्ष सौ. शोभा खंडारे, सदस्य संजय राजनकर, अशोक घाटे, गुलाब डाबेराव, बिट्टू बहाकर, व बहुसंख्य नागरीक उपस्थित होते

### शिवाजीनगर गट ग्रामपंचायत

जवळच असलेल्या शिवाजीनगर येथील गट ग्रामपंचायतीची ग्रामसभा देखील गावकऱ्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. येथील एकूण ४ प्रभागांची आरक्षण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

प्रभाग क्र. १ नामाप्र - महिला,सर्व साधारण महिला, सर्वसाधारण,
प्रभाग क्र. २ अनुसूचित जाती महिला, सर्वसाधारण महिला , सर्वसाधारण,
प्रभाग क्र ३ मधे नामाप्र जनरल, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण जनरल
प्रभाग क्र. ४ अनु.जमाती, सर्वसाधारण महिला, अशा प्रकारे आहे.

हा कार्यक्रम महसूल अधिकारी,सुधाकर सोनोने तलाठी श्रीमती मंगला मंगळे ग्रामपंचायत प्रशासकीय अध्यक्षा सौ. गायत्री चिम, गुलाम अरिफ प्रशासकीय सदस्य आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत शांततेत संपन्न झाला. दोन्ही गावांत आरक्षण जाहीर होताच आता राजकीय घडामोडींना वेग आला असून इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे.तर काही दिग्गजांना धक्का बसला आहे.

## सर्वोपचार रूग्णालय प्रकरणी निष्पक्ष चौकशी व्हावी

**अकोला :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील व्हीडीओ व्हायरल प्रकरणी नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशीची मागणी ह्यूमन राईट जस्टिस असोसिएशनच्यावतीने करण्यात आली आहे. जीएमसीत रुग्णाला आवश्यक सुविधा वेळेवर मिळाल्या नसतील तर त्याची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित करावी यासाठी संघटनेच्या वतीने अधिष्ठाता यांना निवेदन देण्यात आले.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार दि. ११ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यातील भेसळ माफियांवर नियंत्रण कधी?

**अकोला :** जिल्ह्यात अन्नपदार्थ व दूध भेसळीच्या तक्रारी सातत्याने वाढत असताना अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवायांची आकडेवारी जाहीर केली आहे. मात्र, या कारवायांमध्ये नेमके कोणत्या व्यावसायिकांवर, उत्पादकांवर किंवा विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली, याची माहिती मात्र विभागाने गोपनीय ठेवली आहे. त्यामुळे विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अधिकाऱ्यांनी विविध नमुने तपासणीसाठी पाठविल्याचे, काही नमुने निकृष्ट व भेसळयुक्त आढळल्याचे तसेच संबंधितांवर कारवाई केल्याचे सांगितले. परंतु, कारवाई झालेल्या व्यक्ती, प्रतिष्ठाने किंवा कंपन्यांची नावे जाहीर करण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांना संरक्षण दिले जात आहे का, असा प्रश्न आहे. भेसळ हा केवळ आर्थिक फसवणुकीचा विषय नसून जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर प्रश्न आहे. निकृष्ट व भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे विविध आजारांचा धोका वाढत असताना संबंधित विभागाने कारवाईतील पारदर्शकता दाखवणे अपेक्षित आहे. कारवाई झाली असेल तर संबंधितांची नावे जाहीर करण्यास अडचण काय, असा सवाल सामाजिक संघटना आणि ग्राहक मंचांकडून उपस्थित केला जात आहे.

## पारंपरिक खेळांचे संवर्धन काळाची गरज

# जय बजरंग व्यायाम शाळेचे कार्य कौतुकास्पद - सुमंत सोळंके

प्रतिनिधी ११ जून

**कुंभारी :** बदलत्या काळात पारंपरिक खेळ आणि मैदानी कसरती हळूहळू कालबाह्य होत असताना त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचे कार्य जय बजरंग व्यायाम शाळा करीत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण देऊन सक्षम आणि सुदृढ पिढी घडविण्याचे हे कार्य अत्यंत प्रशंसनीय असल्याचे गौरवोद्गार अकोलाचे उपवनसंरक्षक सुमंत सोळंके यांनी काढले. जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जय बजरंग व्यायाम शाळा केंद्र कुंभारी आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहा दिवसीय ग्रीष्मकालीन निवासी शिबिराच्या समारोप कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नारायण गावंडे होते. याप्रसंगी खालील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये गणेश जाधव (क्रीडा उपसंचालक), सुभाष भालेराव (माध्यमिक उपशिक्षणाधिकारी), प्रकाशभाऊ बिडकर (संस्थेचे संचालक), गजाननराव म्हैसने (जय बजरंग व्यायाम शाळेचे जिल्हाप्रमुख), चंद्रभान अतकरे, सदानंद जाधव, श्रीकृष्ण बिडकर, शत्रुघ्न बिडकर, बाळासाहेब अतकरे, श्रावण नाटकर, पवन जाधव आदींची उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक प्रकाशभाऊ बिडकर, जय बजरंग व्यायाम शाळेचे प्रशिक्षक, प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या ग्रीष्मकालीन शिबिराचे प्रास्ताविक प्राचार्य शत्रुघ्न बिडकर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. श्रीराम पालकर यांनी केले. ग्रीष्मकालीन शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार व्हावे याकडे नेहमीच लक्ष दिले जाते.





## ग्रीष्मकालीन शिबिराच्या समारोपात प्रतिपादन

### विद्यार्थ्यांमध्ये शिस्त अन् संस्कारांची रुजवणूक

यावेळी बोलताना माध्यमिक उपशिक्षणाधिकारी सुभाष भालेराव यांनी आपल्या मनोगतात जय बजरंग माध्यमिक विद्यालय व जय बजरंग व्यायाम शाळेच्या कार्याचे कौतुक केले.

'व्यायाम शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, कौशल्य, संघभावना आणि सहकार्याची भावना विकसित होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देत ज्ञान, कला आणि क्रीडा क्षेत्रातील कौशल्य विकसित करण्याचे कार्य या शिबिरातून होत आहे.' असे मत माध्यमिक उपशिक्षणाधिकारी सुभाष भालेराव म्हणाले.

### क्रीडामहर्षी स्व. तुकारामभाऊ बिडकर यांच्या कार्याचा गौरव

कार्यक्रमात मान्यवरांनी स्वर्गीय क्रीडामहर्षी तुकारामभाऊ बिडकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि राष्ट्रीय भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी या व्यायाम शाळेची स्थापना केली होती. त्यांच्या प्रेरणेतून अनेक खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. स्व. तुकारामभाऊ बिडकर यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत संचालक प्रकाशभाऊ बिडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या दहा दिवसीय निवासी शिबिराचा समारोप अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी खेळाडू, पालक, प्रशिक्षक आणि व्यायाम शाळेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खेळाडूंची थरारक प्रात्यक्षिके

समारोप कार्यक्रमात शिबिरातील विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये खालील खेळांचा समावेश होता. धनुर्विद्या, नेटबॉल, थ्रोबॉल आणि योगासने, लेझीम, लाठी-काठी, योग-प्राणायाम, कवायत आणि झुंबा डान्स, मल्लखांब, रोप मल्लखांब आणि सायकल मल्लखांब यांसारखी थरारक प्रात्यक्षिके या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधून राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याचे कार्य या ग्रीष्मकालीन शिबिराच्या माध्यमातून सातत्याने सुरू असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# न्याय प्रविष्ठ प्रकरणात महापालिकेची घाई अंगलट येणार

- न्याय प्रविष्ठ प्रकरणात महापालिकेने चालविला हातोडा
- रस्ता रुंदीकरणासाठी जमीन घेताना मोबदला दिला नाही



प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** डाबकी रोड रस्ता रुंदी करण करताना त्यासाठीचा मोबदला, जमीन अधिग्रहणाची विहित पध्दत न वापरता थेट महापालिकेने डॉ.छाया देशमुख यांच्या बाधकामावर जेसीबी चालवित आज कहर केला. डॉ.छाया देशमुख यांचे मालकीच्या या जागेचा वाद न्याय प्रविष्ठ असताना महापालिकेने आज केलेली कारवाई वादग्रस्त ठरणार आहे.

जुन्या शहरातील प्रतिथयश आणि विशेषतः महिला रुग्णांच्या मदतीला धावून जाणाऱ्या डॉ.छाया देशमुख आणि त्यांच्या पतीचे हॉस्पीटल समोरील बांधकाम आज महापालिकेने पाडले. ष

रस्ता रुंदी करणासाठी ही कारवाई केल्या गेली. पण, जागेचे मालक यांची कुठलीही संमती या प्रकरणात नव्हती. इतकेच काय तर जमीनीचे हे प्रकरण न्याय प्रविष्ठ होते. असे असताना महापालिकेने बांधकाम पाडण्याची घाई का केली अशी विचारणा डॉ.देशमुख यांनी केली. विविध न्याय निवाड्यात मोबदला दिल्याशिवाय आणि तसा करार केल्याशिवाय कोणाचेही बांधकाम पाडणे गैर असताना ही कारवाई केल्याने डॉ.देशमुख यांनी आश्चर्य व्यक्त केले.

जुन्या शहरातील डाबकी रोडवर असलेल्या डॉ.छाया देशमुख यांच्या हॉस्पीटल समोरील बांधकाम पाडल्याने त्यांना नाहक त्रास झाला. इतकेच नाही तर त्यांच्या प्रतिष्ठेला देखील या माध्यमातून धक्का लावला गेला. महिला रुग्णांसाठी सदैव तत्पर असणाऱ्या डॉ.छाया देशमुख यांना न विचारता ही कारवाई केल्या गेल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या या कारवाई विरोधात डॉ.देशमुख न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहे.

# हिंगणा रोडवरील स्कूल ऑफ स्कॉलर्सचे मोजमाप होणार

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आंदोलनास आले मोठे यश

**अकोला :** सन २०१४ लीज संपली असताना आणि लीज करारनाम्यातील सर्व अटी व शर्थी भंग झाल्या असताना हिंगणा रोडवरील स्कुल ऑफ स्कॉलर्स ची शाळा अनधिकृत पणे उभी आहे. मनसे पदाधिकाऱ्यांनी आज नगर रचनाकार यांची भेट घेतल्यानंतर आंदोलनात्मक भूमिका मवाळ केली.

महापालिका नगर रचनाकार साबळे यांनी सांगितल्यानुसार हिंगणा रोडवरील स्कुल ऑफ स्कॉलर्स या शाळेची लीज ही २०१४ मध्ये संपली. स्कुल ऑफ स्कॉलर्सने स्थानिकांच्या हक्काची ओपन स्पेस गिळंकृत केली आहे. ही ओपन स्पेस स्थानिक नागरिकांसाठी खुली करावी. लीज संपली असल्याने शाळा पुर्णतः रिकामी करुन संपुर्ण जागा स्थानिक लोकांच्या ताब्यात द्यावी. करारनाम्यानुसार नसलेले अतिरिक्त बांधकाम पाडण्यात यावे आणि स्थानिकांसाठी कायम स्वरुपी ओपन स्पेस खुली व्हावी. अशी मागणी मनसेची असून मनसे नेते पंकज साबळे यांनी केली होती. स्कुल ऑफ स्कॉलर्सवर कारवाई करण्यात आली नाही तर मनसे स्टाईल आंदोलनाचा मनसे जिल्हाध्यक्ष इशारा पंकज साबळे यांनी दिला होता. अखेर आज महापालिका नगर रचनाकार यांनी या ठिकाणी मोजमाप साठी महापालिकेच पथक पाठवित अतिरिक्त बांधकाम त्याच बरोबर अनधिकृत ताबा याच्या चौकशीचे आदेश दिले.

# लग्नाचे आमिष दाखवून 35 वर्षीय महिलेवर अत्याचार

### आरोपी सागर ठाकरेला एक दिवसाची पोलीस कोठडी

प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** लग्नाचे आमिष दाखवून एका ३५ वर्षीय महिलेवर रीतसर अनेक वर्ष लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना अकोला येथे उघडकीस आली आहे. पीडित महिलेने लग्नासाठी तगादा लावताच आरोपीने साफ नकार दिल्याने, अखेर या प्रकरणी अकोल्याच्या सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती येथील रहिवासी असलेला आरोपी सागर विलास ठाकरे याने पीडित महिलेला लग्नाचे खोटे आमिष दाखवले होते. या आमिषाला बळी पाडून त्याने सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीत पीडितेसोबत अनेक वर्ष शारीरिक संबंध ठेवले आणि तिचे लैंगिक शोषण केले. काही दिवसांपूर्वी जेव्हा पीडित महिलेने सागरकडे लग्नाचा शब्द पूर्ण करण्याची मागणी केली, तेव्हा आरोपीने तिला लग्नास स्पष्ट नकार दिला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने पोलिसांत धाव घेतली. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीच्या आधारे सिव्हिल लाईन्स पोलीस स्टेशनच्या महिला ठाणेदारांनी तातडीने पावले उचलत आरोपी सागर ठाकरे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच सिव्हिल लाईन्स पोलिसांनी आरोपी सागर ठाकरे याला तात्काळ अटक केली. त्यानंतर त्याला पुढील तपासासाठी आणि पोलीस कोठडीची मागणी करण्यासाठी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## नंद घर आनंद भयो, जय कन्हैया लाल की

# अकोल्यातील दत्त कॉलनीत भागवत कथेदरम्यान श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा थाटात संपन्न





प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** स्थानिक दत्त कॉलनीमध्ये, कै. पुंडलिकराव बंकटराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांच्या पवित्र स्मरणार्थ देशमुख परिवाराच्या वतीने श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी या ज्ञानयज्ञाचे 'चवथे पुष्प' गुंफण्यात आले. यावेळी घडलेल्या अलौकिक श्रीकृष्ण जन्माच्या प्रसंगाने संपूर्ण गोकुळ धाम मध्ये आनंदी आनंद ओसंडून वाहिला आणि उपस्थित भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कथा व्यासपीठावरून बोलताना सुप्रसिद्ध कथा वाचक पंडित सुदर्शनजी शर्मा शास्त्री यांनी आपल्या रसाळ वाणीने श्रीकृष्ण जन्माचा प्रसंग अत्यंत सुंदर रीतीने खुलवला.

कथेच्या प्रारंभी मुख्य यजमान पंकज देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख आणि सौ. कल्पनाताई देशमुख यांच्याच हस्ते अत्यंत पवित्र वातावरणात श्रीमद्भागवत ग्रंथाचे पूजन व आरती करण्यात आली. तसेच व्यासपीठावर विराजमान पंडित सुदर्शनजी शर्मा शास्त्री यांचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. नयनाताई देशमुख यांनी केले. दुपारी कथेदरम्यान भगवान विष्णूंच्या 'वामन अवताराचा' भव्य देखावा देखील भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या धार्मिक सोहळ्याला दत्त कॉलनी व परिसरातील शेकडो भाविक भक्तीभावाने उपस्थित होते. नन्हे लल्लाच्या आगमनाची प्रतीक्षा संपताच संपूर्ण सभामंडप टाळ्यांच्या कडकडाटाने आणि 'जय कन्हैया लाल की' च्या जयघोषाने दुमदुमून गेला. वृंदावन येथील परमेश्वरदासजी यांच्या दिव्य मार्गदर्शनात श्रीकृष्ण जन्माचा मनमोहक देखावा सादर करण्यात आला. या प्रसंगात यजमान परिवारातील सदस्यांनी विविध धार्मिक भूमिका साकारून भक्तीचे वातावरण निर्माण केले. यात नंदराज म्हणून पंकज देशमुख, यशोदा मैया म्हणून सौ. ऋतुजा देशमुख, बाळकृष्ण नन्हा आर्यमन, वसुदेव म्हणून चिन्मय देशमुख, टोपलीतील बालकृष्ण चिरंजीवी तारा यांचा सहभाग होता. कथाकारांनी सांगितले की, कंसाच्या भयापायी वसुदेवांनी रात्रीच्या काळोखात बाळकृष्णाला टोपलीत ठेवून, यमुना नदी पार करत नंद आणि यशोदा मैयाकडे सुखरूप पोहोचवले; आणि येथूनच प्रभूच्या अलौकिक कृष्णलीलांना प्रारंभ झाला. या मंगलमय प्रसंगी माता-भगिनींनी भक्तीरसात तल्लीन होऊन नृत्य केले. संपूर्ण सभामंडपात मिठाई आणि चॉकलेटचा प्रसाद वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

### समुद्रमंथन आणि 'मोहिनी अवतारा'चे श्रेष्ठत्व

कथेच्या पूर्वार्धात पंडित सुदर्शनजी शर्मा यांनी समुद्रमंथनाचा अत्यंत उद्बोधक प्रसंग कथन केला. देव आणि दानवांनी अमृत प्राप्तीसाठी क्षीरसागरात मंदराचल पर्वताची रवी आणि वासुकी नागाची दोरी करून समुद्रमंथन सुरू केले. मंथनातून सर्वात आधी जहाल 'हलाहल' विष निघाले. सृष्टीच्या रक्षणासाठी ब्रह्मदेवांसह सर्व देव भोळ्या शंकराकडे गेले. महादेवांनी माता पार्वतीची अनुमती घेऊन ते विष प्राशन केले व जगाच्या कल्याणासाठी ते आपल्या कंठातच साठवून ठेवले. म्हणूनच त्यांना 'नीळकंठ' म्हटले गेले, अशा शब्दांत शास्त्रीजींनी शिवाचे गुणगान केले. यानंतर मंथनातून ऐरावत हत्ती, कामधेनू गाय, उच्चैःश्रवा घोडा, कौस्तुभ मणी, कल्पवृक्ष, अप्सरा, चंद्र, पारिजात, शंख, माता लक्ष्मी, धन्वंतरी आणि शेवटी 'अमृत कलश' बाहेर आले. दानवांनी अमृत कलश पळवल्यामुळे प्रभूने 'मोहिनी अवतार' धारण केला. मोहिनी रूपाने देवांना अमृत पाजणे सुरू केले. देवांच्या पंक्तीत कपटाने येऊन बसलेल्या 'स्वरभानू' दैत्याला चंद्र आणि सूर्याने ओळखले. त्याने थोडे अमृत प्राशन केले होते, तोच प्रभूने त्याचे मस्तक धडावेगळे केले. तेच पुढे 'राहु आणि केतु' बनले, ज्यांचा संबंध आजही सूर्य व चंद्रग्रहणाशी जोडला जातो, असे शास्त्रीजींनी स्पष्ट केले.

# ओपन स्पेसच्या कंपाउंड वॉलचे काम थांबवण्याची मागणी

### सिद्धिविनायक कॉलनी मधील प्रकार, नागरिकांचा रोष

प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** शहरातील गौरक्षण रोड स्थित सिद्धिविनायक कॉलनी मधील ओपन स्पेस ला कंपाऊंड घालण्याचा घाट सद्या सूरु असून या प्रकाराला स्थानिक नागरिकांनी चांगलाच विरोध केला आहे. सदरच्या कंपाऊंड वॉल मुळे रस्त्यावरील वाहतुकीला जागा अपुरी पडत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे..

अकोला शहरातील गौरक्षण रोड भागात असलेल्या सिद्धिविनायक कॉलनी मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ओपन स्पेस आहे. या ओपन स्पेस वर छोटे हनुमानाचे मंदिर सुद्धा बनविण्यात आले आहे, सदर ओपन स्पेस च्या सुशोभीकरणाकरिता स्थानिक नागरिकांनी सर्वत्र झाडे लावून ओपन स्पेसची सुंदरता वाढविली आहे, परंतु आता याच ओपन स्पेस ला कंपाऊंड वॉल तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले असून या कामाला स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शविला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार सदरचे ओपन स्पेस वर लहान मुले खेळतात तसेच या ओपन स्पेस ला कंपाउंड वॉल ची काहीही गरज नाही, कंपाउंड वॉल केल्यास आजूबाजूचे नागरिकांच्या घरासमोरील रस्ते अरुंद होतील व त्यामुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात त्रास होईल असे नागरिकांचे म्हणणे आहे. महानगरपालिकेने ज्या ठिकाणी निधी खर्च करायला हवा त्या ठिकाणी निधी खर्च न करता चुकीच्या ठिकाणी निधी खर्च करून स्थानिक नागरिकांना असुविधा देण्याचे काम सुरू केल्याने सिद्धिविनायक कॉलनी मधील ओपन स्पेस च्या बाजूला राहणारे नागरिकांनी तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली आहे. सदरचे ओपन स्पेस च्या कंपाउंड वॉल चे काम तात्काळ थांबवावे अशी मागणी त्यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

**माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ११ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# मार्कीत धाबा चालकाचा खून; दोन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ११ जून



**झरी जामणी :** तालुक्यातील मार्की (बु.) येथे धाबा चालकाची लाकडी दांडक्याने मारहाण करून हत्या करण्यात आल्याची घटना बुधवारी उघडकीस आली. या प्रकरणी मुकूटबन पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेत अवघ्या काही तासांत दोन आरोपींना अटक केली.

गजानन ऊर्फ आझाद मोरेश्वर उदकवार (३२, रा. मार्की बु.) असे मृत युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन याने काही महिन्यांपूर्वी मार्की-मुकूटबन मार्गावर धाबा सुरू केला होता. मंगळवारी रात्री धाब्यावरील आचारी सुट्टीवर असल्याने तो एकटाच होता. यावेळी सचिन सुधाकर टोंगे (३०) व साहील राजेश काकडे (३८) हे धाब्यावर आले. जेवण बनवून देण्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद झाला. या वादातून दोघांनी गजाननला मारहाण केल्याचे सांगितले जाते.

घटनेची माहिती मिळताच गजाननचे वडील मोरेश्वर उदकवार व धाकटा भाऊ धाब्यावर पोहोचले. त्यांनी मध्यस्थी करून वाद मिटविला. मात्र, याच रागातून मध्यरात्रीनंतर आरोपी पुन्हा धाब्यावर आले. झोपेत असलेल्या गजाननवर त्यांनी लाकडी दांडक्याने डोके, कपाळ व तोंडावर वार केल्याचा आरोप आहे. गंभीर दुखापतीमुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

बुधवारी सकाळी गजाननची आई धाब्यावर गेली असता तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. घटनेची माहिती मिळताच मुकूटबन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तेथे रक्ताने माखलेला लाकडी दांडका जप्त करण्यात आला.

मोरेश्वर उदकवार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान आरोपी सचिन टोंगे व साहील काकडे (दोघेही रा. मार्की) यांना अटक करण्यात आली.

पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल दीपक ताटे, आसिफ शेख, आशिष गोखरे, निहाल राठोड व रवी इसनकर यांनी तपासात सहभाग घेतला. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) व ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# उमरखेड नगर परिषदेचा मान्सूनपूर्व कामांना वेग



प्रतिनिधी ११ जून

**उमरखेड :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उमरखेड नगर परिषदेकडून मान्सूनपूर्व स्वच्छता आणि नालेसफाई मोहिमेला वेग देण्यात आला आहे. शहरात पाणी तुंबण्याच्या समस्या टाळण्यासाठी गेल्या महिनाभरापासून विविध भागांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून गाळ, झाडझुडपे आणि कचऱ्यामुळे चोकअप झालेल्या लेंडी नाल्याची मोठ्या प्रमाणात साफसफाई करण्यात आली असून विविध प्रभागांतील नाल्यांचीही स्वच्छता सुरू आहे.

## बसस्थानक ते कवडाशा बाबा मार्गावरील मोठी नाली दुर्गंधीच्या विळख्यात

■ शहरातील बसस्थानक ते कवडाशा बाबा परिसरातील मोठ्या नालीमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ व कचरा साचल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. या नालीची तातडीने साफसफाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत असून, प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक सध्या या नालीच्या स्वच्छतेची प्रतीक्षा करीत आहेत.

मंगळवारी नगराध्यक्षा, मुख्याधिकारी, सभापती आणि नगरसेवकांनी शहरातील मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेतला. शहरातून वाहणारा लेंडी नाला हा पावसाळ्यातील अतिरिक्त पाण्याचा मुख्य निचरा मार्ग मानला जातो. मात्र नाल्यात साचलेला गाळ आणि कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळलेला होता. परिणामी मागील वर्षी अनेक भागांमध्ये पाणी साचण्याच्या घटना घडल्या होत्या. यंदा अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी नगर परिषदेकडून जेसीबी, पोकलंडसह विविध यंत्रसामग्रीच्या मदतीने नाल्याचे खोलीकरण करण्यात येत असून गाळ व अतिक्रमणजन्य अडथळे हटविण्याचे काम सुरू आहे. तसेच शहरातील नाले, गटारे आणि जलनिस्सारण मार्गांमधील साचलेला गाळ व कचरा काढण्यात येत आहे.

या उपाययोजनांमुळे पावसाचे पाणी सुरळीतपणे वाहून जाण्यास मदत होणार असून नागरिकांना पाणी तुंबण्याच्या समस्येपासून दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. नगर परिषदेच्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी विजयानंद भुतडा

प्रतिनिधी ११ जून

**उमरखेड :** यवतमाळ जिल्हा माहेश्वरी संघटनेची २०२६ ते २०२९ या कालावधीसाठीची नवीन जिल्हा कार्यकारिणी उमरखेड येथील सेठ गो. से. सारडा राजस्थानी भवन येथे झालेल्या बैठकीत निर्विरोध निवडण्यात आली. अध्यक्षपदी विजयानंद भुतडा तर सचिवपदी डॉ. दिनेश चांडक यांची नियुक्ती करण्यात आली.

## "अध्यक्ष नव्हे, सेवक म्हणून काम करणार" – विजयानंद भुतडा, नवनियुक्त अध्यक्ष



■ नवनियुक्त अध्यक्ष विजयानंद भुतडा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "मी अध्यक्ष म्हणून नव्हे तर समाजाचा सेवक म्हणून कार्य करणार आहे. पुढील तीन वर्षांत प्रत्येक उपक्रमाचे योग्य नियोजन करून त्यावर सखोल विचारविनिमय करण्यात येईल. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि परिणामकारक कामांवर भर दिला जाईल." असे त्यांनी सांगितले.

निवर्तमान अध्यक्ष मनोहरलाल लड्ढा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला प्रदेश माहेश्वरी संघटनेचे सचिव डॉ. प्रशांत मोदानी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी निवडणूक पर्यवेक्षक अजय मोदानी, निवडणूक अधिकारी अरुण अटल, ॲड. श्याम भट्टड, मनोज माहेश्वरी आणि विनोद तेला यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन आणि महेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व पदांसाठी प्रत्येकी एकच नामांकन अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी उमरखेडचे विजयानंद भुतडा, सचिवपदी यवतमाळचे डॉ. दिनेश चांडक, उपाध्यक्षपदी दिग्रसचे दिनेश लड्ढा, कोषाध्यक्षपदी पुसदचे सतीश भंडारी, प्रचार-प्रसार मंत्रिपदी राजेश माहेश्वरी, सहसचिवपदी प्रीतम राठी आणि संघटन मंत्रिपदी संजय मंत्री यांची निवड करण्यात आली.

या सभेला यवतमाळ, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड आणि बाभूळगाव तालुक्यांतील समाजबांधव, पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संदीप भट्टड यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोपाल भराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमरखेड माहेश्वरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तडीपार आरोपीकडून देशी कट्टा जप्त



प्रतिनिधी ११ जून

**उमरखेड :** उमरखेड पोलीस स्टेशन हद्दीतून तडीपार करण्यात आलेला अरिशोद्दीन मोहम्मद तारेकोद्दीन खतीब (वय 24) हा हैदराबाद येथून उमरखेड येथे येऊन देशी कट्टा (अग्निशस्त्र) बाळगत असल्याची गोपनीय माहिती पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे उमरखेड पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून अंदाजे 30 हजार रुपये किमतीचा देशी कट्टा व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायद्याच्या कलम 3/25 तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 142 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाई पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकट गंगलवाड, पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे, हेड कॉन्स्टेबल चंदन जाधव, पोलीस शिपाई दिगांबर गीते, संघशील टेंबरे तसेच उमरखेड पोलीस स्टेशनच्या डीबी पथकातील कर्मचाऱ्यांचा समावेश होता.


बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींविरोधात उमरखेड पोलिसांची ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात असून परिसरात खळबळ उडाली आहे.

# दिग्रसमधून हजारो भक्त शेगावकडे रवाना

प्रतिनिधी ११ जून

**दिग्रस :** जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्यासाठी दिग्रससह यवतमाळ जिल्ह्यातील हजारो माऊली भक्त 14 व 15 जून रोजी शेगावकडे रवाना होणार आहेत. या भव्य सोहळ्याचे आयोजन श्री गणेश प्रस्थ मंगल कार्यालय, श्री पुरुषोत्तम हरी पाटील नगर, एमएसईबी चौक, खामगाव रोड, शेगाव येथे सकाळी 9 वाजता करण्यात आले आहे.

पश्चिम विदर्भ पीठ प्रमुख कुंडलिकराव वायभासे, व्यवस्थापक सुरेश मोरे, उपव्यवस्थापक ऋषिकेश बिरारी आणि प्रसिद्धी प्रमुख अमर इधोळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. या कार्यक्रमासाठी यवतमाळ पश्चिम जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातून मोठ्या संख्येने भाविक, साधक, शिष्य व हितचिंतक उपस्थित राहणार असून शेगाव परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.



संस्थानाच्या वतीने ग्रामस्वच्छता अभियान, इंग्रजी माध्यमांच्या मोफत शाळा, वेदपाठशाळा, रक्तदान शिबिरे, मोफत दवाखाने, मरणोत्तर देहदान, अवयवदान, महिला सक्षमीकरणासाठी शिलाई यंत्र व घरघंटी वाटप, मोफत रुग्णवाहिका सेवा तसेच कायदेविषयक साक्षरता शिबिरे यांसारखे विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. राज्यातील विविध महामार्गांवर 53 मोफत रुग्णवाहिका 24 तास अपघातग्रस्तांच्या सेवेसाठी कार्यरत असल्याचेही सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी म्हणजे 14 जून रोजी साधक दीक्षा तर 15 जून रोजी उपासक दीक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दोन्ही दिवस भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

यवतमाळ पश्चिम जिल्हा सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष गोविंद उपासे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भारत वानखेडे तसेच तालुका व जिल्हा सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून जगद्गुरूंच्या प्रवचन, समस्या मार्गदर्शन आणि दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

दिग्रससह संपूर्ण परिसरातून मोठ्या संख्येने भक्त शेगावकडे रवाना होणार असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# झानंभूमी चापर्डा येथे दहा दिवसीय निवासी पालीभाषा शिबिर

प्रतिनिधी ११ जून

**यवतमाळ :** कळंब तालुक्यातील झानंभूमी चापर्डा येथे मैत्रेय बोध संस्था आणि मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागाच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसीय निवासी पालीभाषा शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले आहे. पाली भाषेचा प्रचार-प्रसार तसेच बुद्ध धम्माची तत्त्वे अधिक व्यापकपणे लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.





शिबिराचे आयोजन मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. योजना भगत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, एकूण दहा प्राध्यापक विविध विषयांवर मार्गदर्शन करीत आहेत. यामध्ये प्रा. दयानंद मिसाळकर, प्रा. जोशना भगत, प्रा. संदीप भगत, प्रा. लक्ष्मण सोनवणे, प्रा. डॉ. सुरेश माटे, प्रा. नामदेव मोडक, प्रा. मनीषा कांबळे, प्रा. प्रज्ञा गाणार आणि प्रा. अर्चना ठोकळे यांचा समावेश आहे. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिचा अभ्यास आणि प्रसार वाढविण्यासाठी अशा प्रकारचा उपक्रम प्रथमच राबविण्यात येत असल्याचे मत प्रा. दयानंद मिसाळकर यांनी व्यक्त केले. शिबिरासाठी भिक्खू मित्र बोधी अशोक यांनी मार्गदर्शनासह सहभागींच्या निवास व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केली. या शिबिरात पाली भाषा शिकण्यासाठी विविध क्षेत्रांतील अभ्यासक, विद्यार्थी तसेच अनेक उच्चपदस्थ अधिकारी सहभागी झाले आहेत. कळंब येथील प्रा. अंभोरे तसेच युवा व क्रीडा मंत्रालयाच्या माजी संचालक काटकर मॅडम यांनीही शिबिराबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करून उपक्रमाचे कौतुक केले.

पाली भाषेच्या अध्ययनासोबतच बौद्ध संस्कृती, इतिहास आणि तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारे हे शिबिर सहभागींसाठी ज्ञानवर्धक ठरत असून परिसरात त्याचे स्वागत होत आहे.

# काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला भाजपमध्ये जाहीर प्रवेश

प्रतिनिधी ११ जून



**झरी जामणी :** महामानव क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त माथार्जून येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार संजीवरेड्डी बोतकुलवार यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर शिवाजी चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. उपस्थितांनी भगवान बिरसा मुंडा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर करत समाजहित व राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमानंतर आयोजित सभेत उभाठा गट तसेच काँग्रेस पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. माजी आमदार संजीवरेड्डी बोतकुलवार यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश सोहळ्यात भाजपचे तालुका पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी भाजपच्या जनसंपर्क अभियानाचा जयघोष करण्यात आला. पक्षाच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास व्यक्त करत नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी पक्ष संघटन बळकट करण्यासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सहभागी कार्यकर्त्यांनी सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी जपत विकासाच्या प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले.

# एमआरपी कायद्यात तातडीने दुरुस्ती करा; ग्राहक पंचायतीची मागणी

प्रतिनिधी ११ जून

## जंतर-मंतरवरील आंदोलनाला जनतेने सक्रिय पाठिंबा द्यावा – डॉ. नारायण मेहरे



**यवतमाळ :** कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) व्यवस्थेतील त्रुटींमुळे सर्वसामान्य ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करत विद्यमान एमआरपी कायद्यात तातडीने दुरुस्ती करून पारदर्शक आणि प्रभावी कायदा करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केली आहे. या मागणीसाठी 12 जून रोजी दिल्ली येथील जंतर-मंतरवर देशभरातील ग्राहक पंचायत कार्यकर्त्यांचे एकदिवसीय सांकेतिक धरणे आंदोलन होणार असल्याची माहिती विदर्भ प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. मेहरे म्हणाले की, वस्तूंच्या किमती निश्चित करण्यासाठी कोणतेही स्पष्ट सूत्र नसल्याने उत्पादकांकडून मनमानी एमआरपी छापली जाते. त्यामुळे ग्राहकांना 'एकावर एक मोफत', '50 टक्के सूट' अशा आकर्षक घोषणांच्या माध्यमातून फसवले जाते.

वस्तूंच्या किमतीत पारदर्शकता आल्यास ग्राहकांची लूट थांबून महागाईवर नियंत्रण ठेवण्यासही मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

ग्राहक पंचायत स्थापनेपासून ग्राहक हितासाठी कार्यरत असून 1986 चा ग्राहक संरक्षण कायदा आणि 2019 मधील सुधारित कायदा अस्तित्वात आणण्यात संस्थेचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. औषधे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपडे आदी क्षेत्रांत एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

एमआरपीचे निश्चित सूत्र असलेला आणि किमतीत पारदर्शकता आणणारा कायदा संसदेत मंजूर व्हावा यासाठी देशभरातील खासदार, मंत्री, जिल्हाधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदने दिली जात आहेत. विदर्भातील सर्व 11 जिल्ह्यांत जनजागृती, पत्रक वाटप व आंदोलनाची तयारी सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

पत्रकार परिषदेला हितेश सेठ, संतोष डोमाळे, विरेंद्र चौबे, अनंत भिसे, डॉ. केशव चेटूले, जिनेंद्र बंगाले, प्रवीण पाटील आणि राजेश पोहरे उपस्थित होते.

# १५ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर किसान सभेचे आंदोलन

प्रतिनिधी ११ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य किसान सभा जिल्हा शाखेची जिल्हा कौन्सिल बैठक ८ जून रोजी श्रमशक्ती भवन येथे जिल्हाध्यक्ष कॉ. अनिल घाटे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत जिल्ह्यातील शेतकरी व आदिवासी बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.

शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी हटविणे, किसान विमा योजनेतून यवतमाळ जिल्ह्याला वगळण्याचा निर्णय मागे घेणे, विहिरींचे प्रलंबित अनुदान हप्ते तातडीने वितरित करणे, शेतपांदण रस्त्यांची दुरुस्ती करणे आणि शेतमालाला हमीभाव देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच आदिवासींच्या बळकावलेल्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. शासनाकडून या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या सर्व प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि शेतकरी-आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी १५ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य हल्लाबोल आंदोलन करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. बैठकीला जिल्हा सचिव कॉ. गुलाब उमरतकर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. ११ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## शुक्रवारी जागतिक बाल कामगार प्रथाविरोधी दिन

**अमरावती:** बालमजुरी या अनिष्ठ प्रथेविरूद्ध विस्तृत प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. ही समस्या ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांशी निगडीत असल्यामुळे नागरिकांमध्ये सजगता आणण्यासाठी १२ जुन रोजी जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिवस साजरा करण्यात येतो. जिल्ह्यात सन २०२१ ते सन २०२६ पर्यंत ५८ धाडसत्राचे करण्यात आले. यात १८१ आस्थापनांना भेटी देऊन २५ बालक, बालकामगार मुक्त केले आहेत. यामध्ये १४ वर्षाचे आतील १० बालकामगार आहे. तसेच १४ वर्षावरील १५ बालक आहे. बालकामगार कामावर ठेवलेल्या ८ मालकावर बालकामगार अधिनियम, १९८६ अंतर्गत न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. मुक्त केलेल्या बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनाकरीता शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद व महापालिका यांच्यामार्फत १४ वर्षाखालील बालकामगाराचे पुनर्वसन करण्यात येते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन सामाजिक उपक्रमांनी साजरा

### आ. सुलभा खोडके जनसंपर्क कार्यालयात कार्यक्रम, पक्षाला गत वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार

प्रतिनिधी ११ जून

**अमरावती:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वर्षाचा प्रवास हा केवळ एका राजकीय पक्षाचा इतिहास नाही, तर महाराष्ट्राच्या विकासाचा, समृद्ध परंपरेचा, लोकविकासाचा, शेतकऱ्यांच्या संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा इतिहास आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशभरात पक्षाचा विस्तार करण्यासाठी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अधिकाधिक सक्षम आणि बळकट होऊन भरारी घेतली आहे. अजितदादांचे कार्य हे आपल्या सर्वांसाठी फार मोठी प्रेरणा आहे. राष्ट्रवादीचे हेच वलय. लौकिक आणि वैभव आता राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वात पुढे आणण्यासाठी व प्रत्येक सर्वसामान्य सहकाऱ्यांना पाठबळ देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार राष्ट्रवादी परिवाराने व्यक्त केला.



आज बुधवार दिनांक १० जुन २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वा वर्धापन दिन आमदार सुलभा खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे मोठ्या समर्पण , संघर्ष व संकल्प भावतेतून साजरा करण्यात आला. सर्वप्रथम पक्षाचे प्रेरणास्थान दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. त्यांनतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ध्वजाचे ध्वजारोहण व मानवंदना देऊन पक्षाचा गौरव सोहळा साजरा करण्यात आता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा.सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वात तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे यांच्या मार्गदर्शनात व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश महासचिव ( संघटन ) आ.संजय खोडके यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या वतीने हा २७ वा वर्धापन दिन अत्यंत भावनिक आणि समर्पित वातावरणात संपन्न झाला.

महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी, शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी, युवकांच्या भविष्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी लोकनेता अजितदादा पवार अहोरात्र झटत राहिले. अजितदादांची स्वप्नपूर्ती व त्यांचे विकासाचे व्हिजन आता पुढे न्यायचे असल्याने आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रावहीनी अजित पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षाला नवे बळ व नवी ऊर्जा देण्याचा संकल्प यावेळी तमाम उपस्थित राष्ट्रवादी परिवाराच्या वतीने व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ वर्षाच्या प्रवासात पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते यांचा मोलाचा वाटा आहे, अजितदादांच्या स्वप्नपूर्ती व विकासाच्या समृद्धीच्या दिशेने जाण्यासाठी आपल्या सर्वांना जोमानं कामाला लागायचं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर जनतेने दाखवलेला विश्वास, दिलेले प्रेम, आशीर्वाद याबद्दल श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी आभार व्यक्त करीत सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २७ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, राष्ट्रवादी युवती सेल, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दल, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मागासवर्गीय सेल, अल्पसंख्यांक सेल, राष्ट्रवादी किसान सेल, नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## सिकची चॅरिटेबल ट्रस्ट वलगावतर्फे गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी ११जून

**अमरावती :** स्थानिक सिकची रिसॉर्ट, वलगाव येथे प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे दिनांक ०६/०६/२०२६ङ रोजी वलगाव येथील दहावी व बारावी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, यामधे प्रामुख्याने स्व. बाबासाहेब वऱ्हाडे कन्या विद्यालय व कनिष्ठमहाविद्यालय वलगाव , श्री व्यंकटरावजी निर्मळ विद्यालय वलगाव व प्रेमकिशोर सिकची हायस्कूल , उर्दू हायस्कूल या सर्व विद्यालयातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी प्रामुख्याने कु. स्नेहल उंबरकर, कु. प्रेरणा गजभिये, कु सुहाना मुल्ला, अभिनव वानखडे, भावना धनसुईकर, शेख अरफत शेख अफसर, कु. प्राची सहारे, जान्हवी तसरे, सादीया शेख समीर, यासमीन फिरदोस शाह, आशना फिरदोस शेख, सौंदर्या दादाराव नागदिवे, जान्हवी रविन्द्र तायडे, धनश्री अनिल खरे, जय रणजित सिंग्रोल राणी ज्ञानेश्वर तायडे, वैष्णवी गोपाळराव इंगळे, तनुश्री राजकुमार भांगे, जावेरिया अरिफ नायक, श्रावणी देशमुख, अशमीरा अली, क्षितिजा गादे तसेच कु. युक्ति अविनाश भोगे व कु. उत्कर्षा किशोर निर्मळ व आयेशा शाहेर इरफान बेग सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांच्या आई- वडिलांचा प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन राज्यसभा खासदार माननीय डॉ. अनिलजी बोण्डे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री डॉ. पुरुषोत्तम भापकर ॅ. घँए, कार्यक्रमाचे उद्घाटक निवडणूक सचिव श्रीमती भाग्यश्री बानायत घँए, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. चेतन शेलोटकर ॅ. ण्दर्स्ईह्, , मिशन आय एस एस चे संचालक प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे, सचिनजी माळकर संचालक गजानन कडू, मुख्याध्यापक मनीषा निर्मळ , विलास वानखडे, रस्ता सुरक्षा अभियानाचे विभागीय समादेशक सागरसिंग. या वेळी ळझ्एण् उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



## शैक्षिक महासंघ आयोजित औषधीनिर्माणशास्त्र प्राध्यापक समन्वय बैठक संपन्न

### औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, प्राचार्य व प्राध्यापकांच्या केंद्रीय, राज्य व विद्यापीठस्तरीय प्रश्नांच्या निराकरणासाठी संघटना कटिबद्ध : प्रा. प्रदीप खेडकर

प्रतिनिधी ११जून

**अमरावती:** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ आयोजित औषधीनिर्माणशास्त्र विषयाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व संघटनात्मक विकासाच्या उद्देशाने विभागीय प्राध्यापक समन्वय बैठक नुकतीच ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न ३८ औषधीनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील सुमारे ७५ प्राचार्य व प्राध्यापक बंधू-भगिनी या बैठकीत सहभागी झाले होते. बैठकीस अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष (उच्च शिक्षण) प्रा. प्रदीप खेडकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. अध्यक्षस्थानी विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनल भोंडे होत्या.



प्रा. प्रदीप खेडकर

बाै ठ कां ी ता औषधनिर्माणशास्त्र शिक्षणाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने प्रा. डॉ. दिनेश खेडकर यांनी १५ जुलै २०२५ रोजी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ३३ (आय) नुसार औषधनिर्माणशास्त्र शाखेसाठी स्वतंत्र पाच तदर्थ अभ्यासमंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याबद्दल उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वतंत्र अभ्यासमंडळांची स्थापना आवश्यक असून आर्थिक कारणांचा दाखला देत विद्यापीठ प्रशासन या विषयाकडे दुर्लक्ष करीत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

याबाबत मार्ग काढण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने माननीय कुलगुरू, प्र-कुलगुरू व कुलसचिव यांच्यासोबत तातडीने चर्चा करावी, अशी सूचना प्रा. प्रदीप खेडकर यांनी केली. याशिवाय सत्र २०२४-२५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविण्यात आलेल्या संलग्नीकरण शुल्काबाबतही प्राचार्य व प्राध्यापकांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला. अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या तुलनेत औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांकडून अधिक शुल्क आकारण्यात येत असल्याने या शाखेवर अन्याय होत असल्याचे मत अनेकांनी नोंदविले.

## अमरावतीत धाडसी घरफोडी! गोपाल टॉकीज परिसरातून ४ लाखांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी ११जून

**अमरावती :** अमरावतीत धाडसी घरफोडी! गोपाल टॉकीज परिसरातून ४ लाखांचा ऐवज लंपास केले. कुटुंब पुण्याला गेले असताना चोरट्यांचा डाव यशस्वी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी, राजापेठ पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.



शहरातील गोपाल टॉकीज परिसरात मोठी घरफोडीची घटना समोर आली असून अज्ञात चोरट्यांनी एका बंद घरावर डल्ला मारत तब्बल ४ लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल टॉकीज परिसरातील रहिवासी मंगेश रमेशराव उबाळे (वय ५०) हे आपल्या कुटुंबासह पुणे येथे गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने तसेच २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण सुमारे ४ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. उबाळे कुटुंब घरी परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तात्काळ राजापेठ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कामाला लागले आहे.

शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी नागरिकांना घर बंद ठेवून बाहेर जाताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

## प्राणघातक शस्त्र जवळ बाळगून इन्स्टाग्रामवर फोटा व्हायरल करणाऱ्यांना अटक

प्रतिनिधी ११ जून

**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुण इन्स्टाग्रामवर फोटा व्हायरल करणा-या आरोपीतांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस स्टेशन राजापेठचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना इन्स्टाग्रामवर काही इसम हातात चाकु, तलवार सारखे प्राणघातक शस्त्र बाळगुन फोटो इन्स्टाग्राम, सोशल मिडीयावर व्हायरल होत असल्याची माहीती मिळताच त्यांनी राजापेठ डि.बी ला आदेश देवुन ताबडतोब व्हायरल फोटोमधील इसमांना पकडुन कार्यवाही बाबत आदेश दिल्याने राजापेठ डि बी चे मनीष विनायकराव करपे, ब न १५२० हे १०/०६/२०२६ चे १० वा पासुन स्टॉफसह पेट्रोलींग व इन्स्टाग्रामवर प्राणघातक शस्त्र हातामध्ये घेवुन तो फोटा व्हायरल करणा-या इसमांवर कार्यवाही करीत असतांना तिन इसम प्राणघातक शस्त्र घेवुन शिवाजी चौक, हमालपुरा, अमरावती येथुन जात आहे. अशा मिळालेल्या बातमीच्या आधारे शिवाजी चौक, हमालपुरा, अमरावती येथे पो. स्टॉफ व पंचां समक्ष आरोपी रोहीत अरवींद महाजन, वय २४ वर्षे, रा. गोपाल पापळ केंद्रा मागे, हमालपुरा अम., तेजस भारत भोंगे, वय २१ वर्षे, रा. हमालपुरा, अम., प्रतीक शिवाजी कापसे, वय २५ वर्षे, रा. हमालपुरा, अमरावती यांना ताब्यात घेण्यात आले.



नमुद आरोपी कमांक ०१ याचे कडुन एक लोखंडी पात्याची तलवार, आरोपी क्रमांक ०२ याचे कडुन एक लोखंडी पात्याची फरशा व आरोपी कमांक ०३ याचे कडुन एक लोखंडी पात्याची गुप्ती असा एकुण ४००० रूचा पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

नमुद आरोपीतांपैकी आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांचे हातामध्ये प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुन इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करून सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये दहशत पसरवीत होते. वरून त्यांचे विरूध्द पो. स्टे. ला अपराध कमांक ४९०/२०२६ कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये दाखल करण्यात आला.

सदर प्रकणामध्ये आरोपी रोहीत अरवींद महाजन याचे कडुन कडुन एक लोखंडी पात्याची तलवार ज्याचीएकुण लांबी ३५ इंच, पात्याची लांबी २८.५ इंच, पात्याची रूंदी १.५ ईच, मुठची लांबी ६.५ असलेली आरोपी तेजस भारत भोंगे याचे कडुन एक लोखंडी पात्याची फरशा ज्याची एकुण लांबी १७.१ इंच, पात्याची लांबी ९.२ इंच, असे असुन पाते दोन्ही बाजुने टोकदार असलेले व आरोपी प्रतीक शिवाजी कापसे, याचे कडुन एक लोखंडी पात्याची गुप्ती ज्याची एकुण लांबी १४.४ इंच, पात्याची लांबी ७.५ इंच, रूंदी ६.५ सेमी, मुठची लांबी ६.९ इंच असे असुन समारील बाजुने टोकदार असलेली असा एकुण ४००० रूचामाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त, संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, पोहेकों मनीष करपे, पोहेकों पंकज खटे, पोहेका रवि लिखितकर, पोका अर्जुन कदम यांनी केली.

## मोदींच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी अंबादेवी-एकवीरा मंदिरात महाआरती

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी १२ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त भाजपकडून विशेष आयोजन; खासदार डॉ.अनिल बोंडे यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी ११ जून

**अमरावती :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेतून निवडून येत सलग ४३९९ दिवस पंतप्रधानपद भूषवून नवा विक्रम प्रस्थापित केला असून त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त आज अमरावतीचे आराध्य दैवत असलेल्या श्री अंबादेवी व श्री एकवीरा देवी मंदिरात भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले. भारतीय जनता पक्षाचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी तसेच भारत राष्ट्राच्या निरंतर प्रगतीसाठी देवी चरणी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. मंदिर परिसरात देशभक्ती आणि भक्तीभावाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी मोदी सरकारच्या गेल्या बारा वर्षातील विविध विकासकामांचा गौरव करत विकसित भारताच्या संकल्पनेला पाठिंबा व्यक्त केला.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, नगरसेविका प्रशांत देशपांडे, नगरसेवक संजय तीर्थकर, नगरसेवक मिलिंद बांबल, नगरसेविका सौ. राधाताई कुरील, नगरसेविका सौ. स्मिताताई सूर्यवंशी यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, महिला मोर्चा, युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जगाच्या पटलावर निर्माण केलेली वेगळी ओळख, देशातील पायाभूत सुविधा विकास, जनकल्याणकारी योजना, आत्मनिर्भर भारत अभियान तसेच विविध क्षेत्रांतील प्रगती यांचा उल्लेख केला. मोदी यांच्या नेतृत्वामुळे भारताची जागतिक प्रतिष्ठा अधिक उंचावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. महाआरतीनंतर उपस्थितांनी राष्ट्रहित, समाजकल्याण आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सामूहिक प्रार्थना केली. भाजप कार्यकर्त्यांनी मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

धार्मिक श्रद्धा आणि राष्ट्रभक्तीचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मंदिर परिसरात उपस्थित नागरिकांनीही महाआरतीत सहभाग घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य व निरोगी आरोग्यासाठी प्रार्थना केली.

## अनधिकृत भंगार दुकानांवर महानगरपालिकेची कारवाई; चार ट्रक भंगार साहित्य जप्त

प्रतिनिधी ११जून

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या आदेशान्वये व सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील अनधिकृत भंगार दुकानांवर अतिक्रमण निर्मूलन विभागाने कारवाई केली. या मोहिमेदरम्यान घुमंतुकांकडून भंगार साहित्य खरेदी करणाऱ्या अनधिकृत भंगार दुकानांचे अतिक्रमण हटविण्यात आले.



अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली अन्सार अहमद व संदीप सोनोने यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान सुमारे चार ट्रक भंगार साहित्य जप्त करण्यात आले असून ते कंपोस्ट डेपो येथे जमा करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या पथकाने श्याम चौक येथील बीएसएनएल कार्यालयाच्या मागील भागात, जुने तहसील कार्यालय परिसरात तसेच जवाहर गेट रोडवरील रस्त्यालगत असलेल्या अनधिकृत भंगार दुकानांचे अतिक्रमण हटविले. सदर कार्यवाहीमध्ये पोलीस कर्मचारी व अतिक्रमण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि ११ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर,
बोगस करॅक्टर...




## आरोपी डमी, कारवाई न करण्याची हमी, यंत्रणा निकामी...

# जन्मापूर्वीच घात, दररोज गर्भपात!

*** मोबाईल लोकेशन शोधा, आरोपीला अटक करा, जनतेची मागणी**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी राजाश्रय असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या 'निष्ठा' वान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या कथित सोनोग्राफी सेंटर वर 'सिंघम' स्टाईल धाडसी कारवाई करून अविवेकी दाम्पत्याचे काळे कारनामे उघडकीस आणून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु ही धडाकेबाज कारवाई करतांना अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर असलेल्या आणि अविवेकी डॉक्टरच्या प्रत्येक पापात सहभागी असलेल्या 'पुरोगामी' पत्नीचे नाव 'ज्ञात' असूनही तक्रार देतांना 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केल्याने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीबाबत परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची माहिती असून आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधून अटक करण्याची मागणी होत आहे. तीस वर्षापासून जन्मापूर्वीच घात करून दररोज गर्भपात केल्याचीही चर्चा आहे






दोन आठवड्यापुर्वी मालेगाव नगरीत जगजाहीर झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या माने हॉस्पीटल मध्ये खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर बोगस गर्भवती असलेल्या महिलेस पाठवून आरोग्य विभागाने टाकलेल्या कारवाईत माने दाम्पत्यासह काही दलालांची नावे समोर आलीत. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधीक्षक व त्यांची टीम ही धडाकेबाज कारवाई करण्यासाठी माने हॉस्पीटल मध्ये गेले असता त्यांनी समोरच्या दरवाजाने प्रवेश केला. माने दाम्पत्यावर कारवाईची 'विज' कोसळणार असल्याची चाहूल लागताच 'या' बेकायदेशीर कृत्यात सहभागी असलेले सर्व 'ज्ञात' आरोपी मागील दरवाजाने फरार झाल्याची चर्चा आहे. या काळ्या कृत्यात सदैव सहभागी असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'पुरोगामी' विचाराच्या डॉक्टर असलेल्या पत्नीचे नाव सर्वांना ज्ञात असताना या प्रकरणात अज्ञात महिला डॉक्टर असा जाणूनबुजून उल्लेख केल्याची परिसरात चर्चा आहे. तर आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची चर्चाही मालेगाव शहरात होत आहे. तर पोलिस आरोपीला पाठीशी घालत आहेत. त्यामुळे आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधावे आरोपीला अटक करावे, अशी मागणी जनतेतून होत आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मालेगाव पोलीस असमर्थ असतील तर पोलीस अधीक्षकांनी समर्थ असलेल्या एलसीबी कडे तपास सुपूर्द करून या महापापात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना गजाआड करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून केल्या जात आहे.




## थोडक्यात

### जिल्ह्यात मुख्यमंत्री आरोग्यदीप अभियान राबविण्यात येणार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●




आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत मधुमेह, उच्च रक्तदाब आणि इतर असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत असताना किडनीच्या दीर्घकालीन आजारांचे (एख्ऊ) संकटही गंभीर होत आहे. सुरुवातीच्या टप्प्यात या आजाराची लक्षणे स्पष्टपणे जाणवत नसल्यामुळे अनेक रुग्णांमध्ये विकार उशिरा निदर्शनास येतो आणि उपचार अधिक गुंतागुंतीचे होतात. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष मुंबई कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री आरोग्यदीप अभियान' हे जनसामान्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

मुख्यमंत्री आरोग्यदीप अभियानांतर्गत वाशिम जिल्ह्यात किडनीच्या दीर्घकालीन आजारांच्या तपासणीचे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे नागरिकांची किडनीविषयक तपासणी, जोखीम असलेल्या व्यक्तींची ओळख, आजारांचे प्रारंभिक निदान, आवश्यक वैद्यकीय सल्ला तसेच पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. किडनीचे विकार वाढण्यामागे मधुमेह, उच्च रक्तदाब, स्थूलता, धूम्रपान, अपुरी पाण्याची मात्रा आणि अनियमित जीवनशैली ही प्रमुख कारणे मानली जातात. अनेकदा आजाराची लक्षणे गंभीर झाल्यानंतरच रुग्ण वैद्यकीय उपचारांकडे वळतात. त्यामुळे वेळेवर तपासणी आणि जनजागृती हेच या आजारावरील प्रभावी शस्त्र मानले जाते. मुख्यमंत्री आरोग्यदीप अभियान याच उद्देशाने नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये किडनी विकारांची लक्षणे, तपासणी पद्धती, रुग्ण नोंदणी, संदर्भ सेवा, आरोग्य शिक्षण आणि जनजागृती उपक्रम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. अभियानाचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला दिलेले प्राधान्य. आजार होण्यापूर्वीच नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्याचे काम या उपक्रमातून केले जाणार आहे.



## जि.प.च्या ३०५.७० कोटीच्या मुदत ठेवीचे प्रकरण...

# ठेवीवरचे व्याज लाटण्याचे भ्रष्टधोरण!

● सिटी न्युज ब्यरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२५ आर्थिक वर्षातील विकासकामांसाठी प्राप्त झालेला तब्बल ?३०५ कोटी ७० लाखांचा शासकीय निधी खर्च न करता विविध बँकांमध्ये मुदत ठेवी (इऊ) स्वरूपात गुंतविण्यात आल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी केला आहे. यासंदर्भात ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांना स्मरणपत्र सादर करून उच्चस्तरीय चौकशी व फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, केंद्र शासनाने वाशिम जिल्ह्याला 'आकांक्षित जिल्हा' म्हणून घोषित केले असून शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा व इतर पायाभूत सुविधांसाठी प्राप्त निधी तात्काळ खर्च करणे अपेक्षित आहे. मात्र जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी संगनमताने विकासकामांसाठी उपलब्ध निधी खर्च न करता विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांमध्ये मुदत ठेवी म्हणून ठेवला







असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, जिल्हा निधीचे १६५.८५ कोटी, उपकर निधीचे ६८ कोटी, अभिकरण निधीचे ३२ कोटी तसेच इतर विविध निधीचे ३९.८५ कोटी असे एकूण ३०५.७० कोटी मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात आले आहेत. या प्रकारामुळे जिल्ह्यातील अनेक विकासकामे रखडली असून जनतेचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शासनाच्या वित्त विभागाच्या १४ जून २०२१ च्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मुदत ठेवी ठेवताना स्पर्धात्मक प्रक्रिया न राबविता काही विशिष्ट बँकांमध्ये कमी व्याजदराने निधी ठेवण्यात आल्याने आर्थिक गैरव्यवहार व हितसंबंधांचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

राम पाटील डोरले यांनी ग्रामविकास विभागाकडे या प्रकरणाची सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समितीद्वारे १५ दिवसांत चौकशी करण्याची मागणी केली आहे. दोषी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून विभागीय कारवाई करावी, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच महालेखापालांकडून विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, तक्रारीवर १५ दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास आम आदमी पार्टीच्या वतीने मंत्रालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही डोरले यांनी दिला आहे.

## लॉजवरून इसम पडला की पाडला...

# घात की अपघात!

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

वाशीम शहरातील शिवाजी महाराज चौक परिसरातील एका लॉजवरुन एका इसमाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. आशिष बाबाराव शेळके असे या मृतकाचे नाव असून तो वर्धा जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती आहे. मात्र हा इसम पडला की पाडला शिवाय घात आहे की अपघात आहे या विषयी शहरात चर्चा सुरू होत्या.

वाशीम शहरातील शिवाजी चौक परिसरातील एका लॉज मध्ये वर्धा जिल्ह्यातील चार ते पाच जण काही कामानिमित्त थांबलेले होते. मात्र रात्रीच्या सुमारास यामधील मृतक आशीष शेळके हा दारूच्या नशेत असल्याने तो लॉजवरील टिन पत्रावर गेला आणि बाजूला असलेल्या २५ ते ३० फूट खालच्या सिलँपवर



पडला. आणि त्यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. याची कल्पना मृतकचे इतर साथीदार यांनाही नव्हती. मात्र आज सकाळी त्याचा शोध घेतला असता तो बाजूच्या एका सिलँपवर खाली मृत अवस्थेत मिळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि फोरेन्सिक टीम घटना स्थळी दाखल झाले. मृतदेहाचं पंचनामा करून शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. पुढील तपास वाशीम शहर पोलीस करीत आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.

## चार महिन्यांपासून नरेगाचे खाते व्हेरिफिकेशन मुळे रखडले...

# लाभार्थ्यांचे हक्काचे पैसे अडकले!


### मेलवर मेल, तरी एनआयसी फेल

● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड●

रिसोड तालुक्यातील सुमारे १५ ते २० ग्रामपंचायतींच्या मनरेगा खात्यांच्या व्हेरिफिकेशनचा प्रश्न गेल्या तीन ते चार महिन्यांपासून प्रलंबित असून त्यामुळे शेकडो लाभार्थ्यांचा कुशल निधी अडकून पडल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

रोजगार हमी योजनेअंतर्गत संबंधित ग्रामपंचायतींच्या बँकांचे नाव व खाते क्रमांक बदलल्यानंतर नवीन खाती मनरेगा विभागाकडे सादर करण्यात आली होती. विभागाने या खात्यांचे मॅपिंग पूर्ण करून आवश्यक कार्यवाहीही केली. मात्र, एनआयसीकडून अंतिम व्हेरिफिकेशन अद्याप पूर्ण न झाल्याने निधी वितरणाचा मार्ग बंद झाला आहे. विशेष म्हणजे, तालुका स्तरावर यापूर्वी कुशल निधी प्राप्त झाला होता. परंतु संबंधित ग्रामपंचायतींची खाती व्हेरिफाय नसल्यामुळे हा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होऊ शकला नाही. परिणामी तो निधी परत गेला असल्याची माहिती समोर आली आहे. आता मनरेगा अंतर्गत दुसरा कुशल निधी कधीही प्राप्त होऊ शकतो. मात्र, खाते व्हेरिफिकेशनची प्रक्रिया अद्याप रखडलेली असल्याने हा निधीही लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्या ऐवजी परत जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शेकडो लाभार्थी सलग दुसऱ्यांदा हक्काच्या निधीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या प्रकरणी जिल्हास्तरावरून अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार ई-मेलद्वारे माहिती देण्यात आली आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांत दोन ते तीन वेळा स्मरणपत्रे आणि ई-मेल पाठवूनही एनआयसी स्तरावरील प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याची माहिती समोर येत आहे. परिणामी, मनरेगा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मिळणारा कुशल निधी रखडला असून अनेक लाभार्थी आर्थिक लाभापासून वंचित राहण्याच्या मार्गावर आहेत. स्थानिक स्तरावर सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही केवळ तांत्रिक पडताळणीच्या विलंबामुळे शेतकऱ्यांचा निधी अडकणे, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.



ग्रामपंचायतींकडून आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत सादर करण्यात आली असताना, केवळ व्हेरिफिकेशनच्या प्रतीक्षेमुळे लाभार्थ्यांचे हक्काचे पैसे रखडल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन प्रलंबित खाती मंजूर करावीत व लाभार्थ्यांचा निधी त्वरित वितरित करावा, अशी मागणी होत आहे.

# कुठे झाला विकास, केनवड भकास, अधिकारी झकास!

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

केनवडयेथे विविध विकासकामांबाबत आता नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात असून, कागदोपत्री विकासाचा मोठा गाजावाजा होत असताना प्रत्यक्षात अनेक कामांची अवस्था मात्र प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची चर्चा सुरू आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर, खर्चाच्या नोंदी आणि विकासकामांच्या तपशीलात लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दिसत असले, तरी त्या खर्चाचे प्रत्यक्ष परिणाम गावात कुठे दिसतात, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

पाणीपुरवठा, नाली बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, पुल, अंगणवाडी, शाळा, वैद्यकीय उपकेंद्रे तसेच इतर विविध कामांवर खर्च झाल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत. मात्र अनेक ठिकाणी कामांचा दर्जा, कामांचे अस्तित्व आणि खर्चाच्या तुलनेत दिसणारा विकास याबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही ठिकाणी कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची, तर काही ठिकाणी कामांचा मागमूसही नसल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे आता ग्रामस्थ उपरोधिक स्वरात 'केनवडात कागदावरच विकास, कामे भकास; नक्की गावात झाला का विकास..?' असा सवाल करत आहेत. जनतेच्या पैशातून झालेल्या प्रत्येक कामाचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे. केनवडसह परिसरातील इतर गावांबाबतही विविध माहिती आणि कागदपत्रे पुढे येऊ लागल्याने संशय अधिक गडद झाला आहे. त्यामुळे केनवडसह संपूर्ण परिसरातील ग्रामपंचायतींच्या विकासकामांची, मोजमाप पुस्तिका (एमबी), व्हाउचर, अंदाजपत्रके, बिले आणि प्रत्यक्ष कामांची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.

चौकशीत सर्व काही नियमानुसार आढळल्यास प्रशासनाची बाजू स्पष्ट होईल; मात्र अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. 'विकास झाला असेल तर तो दिसला पाहिजे; आणि नसेल तर जबाबदारांवर कारवाई झाली पाहिजे,' अशी प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

**निकृष्ट दर्जाचे करून काम,**
**मिळून-मिसळून गिळला दाम..?**

केनवड येथील काही विकासकामांबाबत नागरिकांमधून संशय व्यक्त केला जात आहे. विविध विकासनिधीतून लाखो रुपयांचा खर्च दाखविण्यात आला असला, तरी काही ठिकाणी कामांचा दर्जा समाधानकारक नसल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. काही कामे थातूरमातूर करून, प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली आणि मात्र उच्च दर्जाची बिले काढण्यात आली का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. पाणीपुरवठा, नाली बांधकाम, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन तसेच इतर विकासकामांवर खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र या खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्षात झालेली कामे आणि त्यांचा दर्जा याबाबत नागरिकांमध्ये शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी झाली का, याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे. जनतेच्या पैशातून झालेल्या प्रत्येक विकासकामाची मोजमाप पुस्तिका (एमबी), व्हाउचर, अंदाजपत्रके, बिले आणि प्रत्यक्ष कामांची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे. चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. अधिकाऱ्यांना निलंबित करून विभागीय कारवाई करावी, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ँ) फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच महालेखापालांकडून विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, तक्रारीवर १५ दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास आम आदमी पार्टीच्या वतीने मंत्रालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही डोरले यांनी दिला आहे.




## माथाडी कामगार ट्रान्सपोर्ट संघटनेच्या विदर्भ अध्यक्षपदी नियुक्ती

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असणारे अनुभवाची शिदोरी असलेले शिवसेनेचे शिंदे गट तालुका प्रमुख मंगेश पाटील मुंदे यांची अखिल भारतीय विकास माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटनेच्या विदर्भ विभाग अध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनिष लांजेवार यांनी मंगेश पाटील यांची काम करण्याची तळमळ व कार्यतत्परता ओळखून विदर्भ विभागाची जवाबदारी दिली आहे. शिवसेना नेत्या विदर्भ कन्या आमदार भावनाताई गवळी यांची प्रेरणा घेऊन शिवसेनेच्या माध्यमातून कारंजा लाड तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून त्या सोडविण्याचा प्रयत्न नेहमीच करीत आले आहे. कारंजा लाड शहर व



**मंगेश मुंदे यांचा शहर शिवसेनेने केला सत्कार**

समस्या मांडण्यासाठी तालुका प्रमुख व पदाधिकारी उपलब्ध व्हावे म्हणून मंगेश पाटील मुंदे यांच्या पुढाकारातून आ. भावनाताई गवळी जनसंपर्क कार्यालय नुकतेच कारंजा लाड येथे उघडण्यात आले. मंगेश पाटील मुंदे यांचा विदर्भ विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल कारंजा लाड शहर शिवसेनेच्या वतीने अध्यक्ष अरुण बिकड व संघटक संदेश जिंतुरकर यांनी सत्कार केला. मंगेश मुंदे यांच्या या नियुक्तीबद्दल अजय मते, संतोष अप्पा परसवार, दिगंबर एकनार, धीरज पाटील व एजाज भाई यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. ११ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## हमाल-माथाडी कामगारांना अंत्योदय योजनेचा लाभ!

**मलकापूर:** बाजार समितीच्या अखत्यारीतील शेकडो हमाल-माथाडी कामगारांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. या अनुषंगाने लाभार्थी इष्टांकात वाढ करण्यात आल्याची माहिती आहे.

मलकापूर बाजार समितींतर्गत कार्यरत असलेल्या अनेक हमाल-माथाडी कामगारांना अद्याप अंत्योदय योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब समोर आली. होती. यासंदर्भात राज्य शासनाने २०१३ मध्ये अध्यादेश जारी केला असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रसाद जाधव यांनी ९ एप्रिल रोजी पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याकडे हा विषय मांडला होता, तसेच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडेही राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडून पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर १ मे २०२५ रोजी शासन स्तरावरून या प्रकरणात तत्काळ आणि योग्य कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.

# सिंदखेड राजा येथे, हजारोंच्या उपस्थितीत भव्य निषेध मोर्चा

**♦खामगाव विधानसभेच्या वतीने अँड अमोल अंधारे व राजेंद्र बघे यांचा सक्रिय सहभाग ♦संतांवरील हल्ल्याचा तीव्र निषेध, दोषींना तात्काळ अटक व मोका अंतर्गत कारवाईची मागणी**

प्रतिनिधी ११ जून

**सिंदखेड राजा:** सिंदखेडराजा येथे गौ सन्मान अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी पूज्य संत श्री बालकृष्ण जी महाराज यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आज हजारोंच्या उपस्थितीत भव्य निषेध मोर्चा व निषेध सभा संपन्न झाली. संत समाज, सकल हिंदू समाज, गोभक्त तसेच विविध धार्मिक, सामाजिक व हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चामध्ये संतांवरील हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी पूज्य संत बालकृष्ण जी महाराज हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात उपचार घेत असल्याने सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र त्यांनी आपल्या संदेशाद्वारे सांगितले की, ठमाझ्यावर झालेला हल्ला हा अत्यंत गंभीर व प्राणघातक स्वरूपाचा होता. या घटनेत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या सर्व व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या तसेच कटात सहभागी असलेल्या सर्वांवर गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी. मला महाराष्ट्र शासन व प्रशासनाकडून न्यायाची अपेक्षा आहे.

आंतरराष्ट्रीय कथावाचक युवाचार्य संत श्री विवेकदास जी शास्त्री महाराज (काशी-वाराणसी) यांनी सांगितले की, सिंदखेडराजा येथे झालेला हा निषेध मोर्चा संत समाजाच्या आक्रोशाची केवळ सुरुवात आहे. प्रशासनाने तात्काळ सर्व दोषींना अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी.ते पुढे म्हणाले की, ठमहाराष्ट्र ही संतांची, महापुरुषांची आणि वारकरी परंपरेची पावन भूमी आहे. अशा भूमीत एखाद्या संतावर हल्ला होणे अत्यंत दुर्दैवी आहे. आज तुम्ही संत समाजाच्या उपस्थितीची केवळ झलक पाहत आहात. जर न्याय मिळाला नाही, तर सिंदखेडराजाच्या भूमीवर संत समाजाचा भव्य महाकुंभ भरू शकतो. उत्तर भारतासह देशभरातील संत-महंत, विविध आखाडे, वारकरी संप्रदाय आणि धर्मप्रेमी येथे येऊन न्यायाची मागणी करतील.



स्वामी अमोलनंद सरस्वती महाराज यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायासह तेरा निर्वाणी आखाडा पूज्य संत बालकृष्ण जी महाराज यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो. महाराजांना न्याय मिळाला नाही तर संत समाज शांत बसणार नाही.

हिंदुत्ववादी नेते मिलिंद एकबोटे यांनी सांगितले की, महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, संत-महंत आणि धर्मरक्षकांची भूमी आहे. अशा भूमीत एखाद्या संतावर हल्ला होणे अत्यंत गंभीर बाब आहे. दोषींना कोणत्याही परिस्थितीत संरक्षण मिळता कामा नये. संत श्री बालकृष्ण जी महाराज यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. संत समाजाच्या न्यायाच्या लढ्याला संपूर्ण हिंदू समाजाचा पाठिंबा आहे.

यावेळी महाराष्ट्र गौ सेवा आयोगाचे सदस्य श्री उद्धवजी नरेकर यांनी सांगितले की, पूज्य संत बालकृष्ण जी महाराज यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र गौ सेवा आयोग तीव्र निषेध करीत असून संत समाजाच्या न्याय्य मागण्यांना पूर्ण पाठिंबा देत आहे. गौ संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संतांवर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. सर्व दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. गजानन महाराज सपकाळ यांनी सांगितले की, संतांवरील हल्ल्यांमुळे समाजामध्ये चुकीचा संदेश जात आहे. प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता दोषींना अटक करून कठोर शिक्षा सुनिश्चित करावी.

हिंदू सेवक गौरक्षक श्री अमोल अंधारे यांनी सांगितले की, पूज्य संत श्री बालकृष्ण जी महाराज यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ एका संतावर झालेला हल्ला नसून संपूर्ण संत समाज, गोभक्त आणि हिंदू समाजाच्या श्रद्धेवर झालेला आघात आहे. गौसंरक्षण आणि धर्मजागरणासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या संतांवर अशा प्रकारचे प्राणघातक हल्ले होणे अत्यंत निषेधार्ह आहे. या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आवश्यक असल्यास मोका अंतर्गतही कारवाई करून अशा प्रवृत्तींना कठोर संदेश देणे गरजेचे आहे. हिंदू सेवक गौरक्षक संत समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील.

सभेत उपस्थित संत-महंत व मान्यवरांनी एकमुखाने मागणी केली की, या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, निष्पक्ष चौकशी करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच आरोपींनी संघटित स्वरूपात कायदा हातात घेऊन हिंसक कृत्य केल्याचा आरोप असल्याने, प्रकरणाची सखोल चौकशी करून आवश्यक निकष पूर्ण होत असल्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (श्ण्र्ध्र्/मोका) अंतर्गत कारवाई करण्याचाही विचार शासन व पोलीस प्रशासनाने करावा, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी साध्वी गायत्री दीदी, मिलिंद एकबोटे, रूपा गुरु टाकसाळ (किन्नर आखाडा प्रमुख), बाळू महाराज काळे, साधन चैतन्य महाराज, शांतानंद महाराज, शरद जी महाराज, ह.भ.प. गजानन महाराज गायकवाड, साध्वी त्रिवेणी दीदी, रामेश्वर महाराज पवार, श्रावण निळकंठ जी महाराज, गजानन महाराज सपकाळ तसेच विविध आखाडे, वारकरी संप्रदाय, संत समाज, गोभक्त व हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच अँड अमोल अंधारे, उज्जवल गव्हाड, श्री शैलेश गोंधणे, प्रवीण अंभोरे, प्रशांत जांबिवाळ,राजेश पिंगळे, राम शर्मा, आदित्य पाटील, रोहित पगारिया, श्री सूरज हनुमंते, अँड. संदीप मेहेत्रे, अक्षय भोजने, मनोज घाटोळ, शिव ठाकूर, श्रावण निळकंठ, केशवजी महाराज, गोकुलभाई, अशोक अग्रवाल, शरद भाला, ओमप्रकाश गोंधणे, सुनील लाहोटी, प्रेमराज भाला, राजू शिंगणे, उद्धवजी नेरकर, सुनील भोजवानी, डॉ. नरेंद्र जोशी (वडनेर) सुशील कोल्हे राजेंद्र बघे अमोल जोशी यांच्यासह विविध सामाजिक, धार्मिक व हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बळीराजा कर्जमाफी न्याय संसदेत सरकारवर शेतकऱ्यांचा घणाघात

प्रतिनिधी ११ जून

**जळगाव जामोद:** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' मधील जाचक अटी, तांत्रिक त्रुटी, अपील यंत्रणेचा अभाव आणि मोठ्या प्रमाणावर पात्र शेतकरी वंचित राहण्याच्या शक्यतेविरोधात ९ जून रोजी तहसील कार्यालय, जळगाव जामोद येथे 'बळीराजा कर्जमाफी न्याय संसद' हे एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन पार पडले.



या आंदोलनातून शासनाच्या कर्जमाफी धोरणावर तीव्र आक्रोश यक्त करत सरसकट कर्जमाफीची जोरदार मागणी करण्यात आली. तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, युवक आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रकाश भिसे यांनी शासनाच्या कर्जमाफी योजनेतील अनेक गंभीर त्रुटींकडे लक्ष वेधले

न्याय संसदेमध्ये उपस्थित नेते प्रसेंजित पाटील, प्रकाश पाटील, स्वातीताई वाकेकर, दत्तात्रय पाटील, गजानन वाघ, सुनिल बोदडे, रामविजय बुरुंगले, सांगितराव भोंगळ, अमोल टिकार, अँड. भाऊराव भालेराव, अविनाश उमरकर, कॉ. रामेश्वर काळे, भिमराव पाटील, रतन नाईक, सौ. वर्षाताई वाघ, समाधान दमधार, राजूभाऊ अवचार पाटील आणि प्रविण मोरखडे यांनी कर्जमाफी संदर्भात भावना व्यक्त केल्या. यावेळी प्रा. नितीन घोपे यांनी कर्जमाफी संदर्भातील शासन निर्णयाचा सविस्तर अभ्यास उपस्थितांसमोर मांडला. यावेळी प्रमोद सपकाळ, मेजर वसंत मिरगे, विजय मारोडे, विजय ठाकरे, विश्वासराव भालेराव, डॉ. प्रशांत राजपूत अमर पाचपोर, ईरफान खान, अजय राजपूत, विठ्ठल साबळे आणि विनोद धोटे यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेतकरी, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड जिल्हा शाखा बुलडाणातर्फे जागतिक नेत्रदानदिन रॅलीची सांगता

प्रतिनिधी ११ जून

**बुलढाणा:** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (राष्ट्रीय अंध कल्याण संघ) बुलडाणा, व बुलडाणा ऑप्थल्मिक सर्जन सोसायटी बुलडाणा तसेच विदर्भऑप्थल्मिक सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने तथा अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचे मार्गदर्शनाखाली आज १० जून २०२६ रोजी नेत्रदान जीवनदान ह्या जनजागृती मोहिम रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक संगम चौक बुलडाणा येथून डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा शल्य चिकित्सक बुलडाणा यांनी रॅलीला हिरवी झंडी दाखून संगम चौक ते जयस्तंभ चौक मार्गे प्रस्थान करण्यात आले.

रॅलीमध्ये सामान्य रुग्णालय नर्सिंगचे विद्यार्थी व वसंतप्रभा नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी यांचा रॅलीमध्ये प्रामुख्याने सहभाग होता. रॅलीत नेत्रदाना विषयाचे फलक लावून नेत्रदान श्रेष्ठदान मरणोपरांत नेत्रदान करा बाबतच्या घोषणा देण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला होता. अशा

प्रकारच्या रॅलीचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड बुलडाणा संस्थेचे कार्यालय, गांधी भवन जयस्तंभ चौक बुलडाणा येथे रॅलीचे आगमन झाले. ह्या रॅलीत सहभाग झालेल्या सर्वांना नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड बुलडाणा तर्फे फळांचे व कोल्ड्रींकचे वाटप करण्यात आले. जागतिक दृष्टिदान बद्दल संग्राम पाटील ठाणेदार बुलडाणा यांनी नेत्रदानाचे महत्व समजावून सागितले डॉ. जोशी, डॉ. शोन चिंचोले यांनी थोडक्यात नेत्रदान जनजागृती बद्दल माहिती सांगितली. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड बुलडाणाचे सचिव डॉ. वसंतराव

चिंचोले वरिष्ठ नेत्रतज्ञ बुलडाणा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, नेत्रदानामुळे कॉर्नियल अंधत्वामुळे अनेक रुग्णांना अंधारात चाचपरत राहावे लागते, त्यांचा आत्मविश्वास कमी होऊन त्याचा परिणाम त्यांच्या उपजिवीकेवर होतो. नेत्रदानानंतर चेहरा विद्रुप होतो, मृत्यूनंतर स्वर्गाची वाट दिसत नाही किंवा पुढील होणाऱ्या पिढ्या अंध म्हणून जन्माला येतात ही उणीव भरून काढण्यासाठी या कार्यक्रमाच्या माध्यमातून नेत्रदान करण्याबाबत जनजागृती मोहीमेचे आयोजन करण्यात आले. कारण या माध्यमाने तरी लोकांमध्ये नेत्रदान करण्याबद्दल त्यांचे विचार बदलतील. डॉ. विकास बाहेकर यांनी नेत्रदानाची जनजागृती होण्यासाठी व जनतेने या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेण्यासाठी अंत्यविधी अथवा रक्षा विसर्जनाच्या कार्यक्रमामध्ये नेत्रदानाची माहिती देणे आवश्यक आहे, असे सूचित केले.

## ५ लाख २० हजारांच्या रोखेसह आरोपीला केली अटक; खामगावमधील घरफोडीचा लावला छडा

प्रतिनिधी ११ जून

**खामगाव:** शहरातील शिवाजीनगर परिसरात भरदिवसा झालेल्या मोठ्या घरफोडीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेच्या (डी. बी. पथक) पथकाने अत्यंत कौतुकास्पद कामगिरी करत अवघ्या काही दिवसांत छडा लावला. पोलिसांनी याप्रकरणी मुख्य आरोपीला अटक केली. त्याच्याकडून चोरीला गेलेली ५ लाख २० हजार रुपयांची संपूर्ण रोकड हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

फिर्यादी योगेश प्रमाकर केवारे (४०, रा. शिवाजीनगर, खामगाव) यांनी याप्रकरणी



तक्रार दाखल केली होती. १ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेदरम्यान ते घराबाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातील लोखंडी कपाटाच्या लॉकरचे कुलूप तोडून त्यामध्ये ठेवलेली ५ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. याप्रकरणी खामगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही धडक कारवाई बुलढाण्याचे पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खामगावचे ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांच्या नेतृत्वात पोउनि अमित तळोले, पोहेकाँ संदीप टाकसाळ, देवेंद्र शेळके, निलसिंग चव्हाण, पोकाँ प्रवीण गायकवाड, केशव झाळटे, मपोकाँ सुवर्णा कदम, चालक नापोकाँ नितीन भालेराव यांनी केली. अवघ्या काही दिवसात गुन्हा उघडकीस आणून संपूर्ण रक्कम हस्तगत केल्यामुळे खामगाव पोलिसांचे आणि डी. बी. पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### पोलिसी खाक्या दाखवताच गुन्ह्याची कबुली

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान मिळालेले तांत्रिक व भौतिक पुरावे, तसेच गुप्तहेर आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांना संशयित ओम अनिल माने (रा. शिवाजीनगर, खामगाव) याच्यावर संशय आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर मंगळवारी त्याला रीतसर अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल (५ लाख २० हजार रुपये) जप्त करण्यात आला.

## विवरा - रणगांव रस्ता अडविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे एसडीओंचे निर्देश

प्रतिनिधी ११जून

**मलकापुर:** तालुक्यातील विवरा -रणगांव गांव जोड रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत सुरू असून अर्ध्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून विवरा येथील दोघा -तिघा शेतकऱ्यांनी रस्ता काम अडविले असून ८०० ते १००० मिटर चा रस्ता रखडला आहे, लवकरच पावसाळा सुरू होत असल्याने ते काम तात्काळ पूर्ण करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) पदाधिकारी व शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांना भेटून आपबिती सांगितली.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील विवरा-रणगांव रस्त्यावर दोघा -तिघा शेतकऱ्यांनी रस्ता काम बंद पाडल्याने गावातील शेतकऱ्यांनी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास सह आदिं पदाधिकाऱ्यांसह उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांची भेट घेऊन निवेदन देऊन शेतकऱ्यांचा रखडलेला रस्ता पावसाळ्यापूर्वी तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली, गावातीलच दोघं -तिघे शेतकरी रस्त्याचे काम अडवित असल्याची माहिती उपस्थित शेतकऱ्यांनी एसडीओ शिंदे यांना दिल्याने गाव जोड रस्त्याचे काम अडविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांनी दिले.पावसाळ्यापूर्वी अडविलेल्य रस्त्याचे काम पूर्ण न केल्यास गावकरी व महीला ग्रामस्थांचा बैठा सत्याग्रह करण्याचा इशारा दिला आहे.

## गटार योजनेच्या कामावरून शेगाव पालिकेत गदारोळ !

**♦ कामाच्या गुणवत्तेवरून शाब्दिक वादाची चर्चा**

प्रतिनिधी ११ जून

**शेगाव:** शहरातील भूमिगत गटार योजनेच्या संथ व निकृष्ट मंगळवारी कामकाजावरून नगरपरिषद कार्यालयात घडलेल्या दोन घटनांची दिवसभर चर्चा रंगली. एका सभापतींनी संबंधित कंत्राटदार कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची, तर दुसऱ्या सभापतींनी नगरपरिषदेतील एका अधिकाऱ्याला शिवीगाळ केल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

माहितीनुसार, भूमिगत गटार योजनेच्या कामांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत होत्या. अनेक ठिकाणी खोदकाम केल्यानंतर रस्ते अपूर्ण अवस्थेत सोडण्यात आल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात वारंवार सूचना देऊनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने संबंधित सभापती नाराज असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, कामाच्या गुणवत्तेबाबत जाब विचारताना एका सभापतींचा कंत्राटदार कंपनीच्या कर्मचाऱ्याशी शाब्दिक वाद झाला. त्यानंतर धक्काबुक्की झाल्याची चर्चा आहे.

**नागरिकांची गैरसोय !**

भूमिगत गटार योजनेअंतर्गत शहरातील आले आहे; मात्र कामाचा संथ वेग आणि खोदकामानंतर रस्त्यांची वेळेत दुरुस्ती न केल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक रस्त्यांवर खोदकाम करण्यात आले.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांत नाराजीचे वातावरण**

लोकप्रतिनिधींना प्रशासनाला जाब विचारण्याचा अधिकार असला, तरी सार्वजनिक ठिकाणी आक्रमक वर्तन अयोग्य असल्याची भावना काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

**अधिकाऱ्यालाही शिवीगाळ**

दुसऱ्या घटनेत, कामातील दिरंगाईवरून एका अधिकाऱ्याला शिवीगाळ करण्यात आल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, या घटनेमुळे प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याती समन्वयाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## जिल्ह्यात १५ जूनपर्यंत पाऊस बरसण्याचा अंदाज

**♦ यंदा जिल्ह्यात सुमारे ५ इंच पाऊस कमी बरसण्याची शक्यता हवामान अभ्यासक प्रकाशभाई पारेख**

प्रतिनिधी ११ जून

**खामगाव:** यंदा सुपर एलनिनो च्या प्रभावामुळे आभाळातील ढग जमा होण्याची गती व ते पुढे सरकण्याची गती मंदावली असल्याने बुलढाणा जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यातील पाऊस १५ जून २६ पर्यंत बसेल असा अंदाज येथील हवामान अभ्यासक प्रकाशभाई पारेख यांनी वर्तविला आहे.

कोकणापर्यंत मान्सून पुढे सरकण्याची गती चांगली होती.परंतु सुपर एलनिनो च्या प्रभावामुळे गोवा. कर्नाटक मुंबईसह इतर ठिकाणी पाऊस येण्याची गती मंदावली आहे, गतिमंदावली असल्याने आभाळात ज्या प्रमाणात काळे ढग जमा व्हायला पाहिजे ते जमा होण्यास विलंब होत आहे,

या विलंबाचा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बरसणाऱ्या पावसावर होत आहे, त्यामुळे जिल्हावासीयांना किमान एक आठवडा पावसाची प्रतीक्षा करीत उकाड्याला तोंड देत दिवस काढावी लागणार आहे,

**हवामान खात्याचा अंदाज चुकला**

हवामान खात्याने यंदा २६ मे पर्यंत मान्सून केरळ मध्ये पोहोचेल असा अंदाज वर्तविला होता पण यंदा ४ जून रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचला, त्यामुळे हवामान खात्याने वर्तविलेला अंदाज पण खोटा ठरला आहे,

### तापमानाचा पारा खाली उतरेना

सुपर एलनिनो च्या प्रभावामुळे यंदा खामगाव सह जिल्ह्यातील तापमानाच्या पाऱ्याने गत १० ते १५ वर्षातील उच्चांक गाठला आहे, मे महिन्यात तर शहराच्या तापमानाने ४४ अंश सेल्सिअस चा पारा पार केला होता, त्यामुळे होणाऱ्या उकाड्याने नागरिक अक्षरशः त्रस्त झाले होते, अंगातून घामाच्या धारा टपकत होत्या सकाळी ९ वाजता पासूनच उन्हाचे तीव्र चटके जाणवत होते, एवढेच नव्हे तर अधून मधून आभाळात येणारे ढग आणि सोसाट्याच्या वाऱ्याने इतरत्र गेल्यानंतर पडलेले ऊन आणि त्या उन्हाचे चटके अधिक तीव्रपणे जाणवत होते, ऊन आहे की काय आहे असे शब्द अनेकांच्या तोंडून आपोआपच निघत होते.

**जिल्ह्यात २६ इंच पावसाची शक्यता**


गेल्या काही वर्षात पावसाळ्याच्या ४ महिन्यात ३२ इंच इतका पाऊस पडला आहे परंतु यंदा पावसाचे उशिरा आगमन आणि त्यात भरीत भर सुपर एलनिनो च्या प्रभावामुळे यंदा एकूण २६ इंच पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करीत प्रकाशभाई पारेख म्हणाले की. ४? ते ५ इंच पाऊस कमी पडेल याचा फटका खरीप हंगामातील पिकांबरोबरच नागरिकांना पाणीटंचाईची काही अंशी का ? होईना सामना करावा लागणार आहे.

### शहरातील आठवड्याभराचे तापमान

१ ते ७ जून २६ या आठवड्याभराच्या कालावधीत शहरातील तापमानाचा आकडा पाहता हा आकडा ४० अंश सेल्सिअसच्या खाली उतरण्याचे नाव घेत नाही, १ ते ७ जून या कालावधीतील तापमानाची प्रकाशभाई पारेख यांनी दिलेली आकडेवारी अशी १ जून ४१ अंश सेल्सिअस. २ जून ४०ष्ट अंश सेल्सियस. ३ जून ४०.५ष्ट अंश सेल्सिअस ४ जून ३९.५ अंश सेल्सिअस ५ जून ४१ अंश सेल्सिअस ६ जून ४०ष्ट अशं सेल्सिअस. ७ जून ४१.५ अश सेल्सिअस व ८ जून ४० अंश सेतिसिऊस इतके तापमान होते.

**शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी किमान ७२



मिलिमीटर पाऊस होई पर्यंत आणि शेतात चांगली ओल येईपर्यंत पेरणीची घाई करू नये शेतकऱ्यांनी १- २ पाऊस पडल्यानंतर पेरणीची घाई केली तर आणि त्यानंतर पावसाने एखाद वेळेस दडी मारली तर शेतकऱ्यांना दुबार पेरणीची वेळ येऊ शकते,

**प्रकाशभाई पारेख**
**हवामान अभ्यासक**
**खामगाव जि बुलढाणा**

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरूवार, दि. ११ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# ई 85 पेट्रोल ने वाढवली पेट्रोल पंप चालकांची चिंता !

## इंधन खराब होण्याच्या भीतीने ग्राहक आणि पंप मालकांमध्ये होतील वाद




प्रतिनिधी ११ जून

**अकोला:** पेट्रोल आणि डिझेल साठी आखाती देशावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने बाजारपेठेत ई ८५ हे पेट्रोल आणले आहे. या पेट्रोलमध्ये ८५% इथेनॉल मिक्स करण्यात आले आहे. या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. हे पेट्रोल सध्याच्या पेट्रोल पेक्षा तब्बल १८ ते २० रुपयांनी स्वस्त असल्याने वाहनधारकांसाठी हा मोठा फायदा वाटत असला तरी पेट्रोल पंप डीलर्स मात्र यामुळे प्रचंड चिंतेत पडले आहेत. आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव आणि इंधन खराब होण्याच्या भीतीमुळे आगामी काळात ग्राहक आणि पंप मालकांमध्ये वाद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अकोला शहरात हे इंधन येण्यास अजून काही वेळ असला तरी लवकरच शहरात हे पेट्रोल उपलब्ध होईल.

### पावसाळ्यात ई ८५ पेट्रोलच्या वाढतील तक्रारी

ई ८५ पेट्रोलमध्ये ८५% इथेनॉल मिक्स राहणार आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोलमध्ये पाण्याचा एक थेंब जरी गेला तरी इथेनॉल पेट्रोल पासून वेगळे होऊन एक वेगळेच सोलुशन तयार होते. ज्यामुळे वाहन बंद पडते किंवा खराब होते. विशेषता पावसाळ्यात दुचाकी वाहनांच्या टाकीत पाणी जाण्याची शक्यता जास्त असते. एक थेंब पाणीही वादाचे कारण ठरू शकते. इथेनॉल मिश्रित पेट्रोल जर गाडीच्या किंवा पंपाच्या टाकीत काही महिने पडून राहिले तर ते वापरण्यायोग्य राहत नाही. अशावेळी संपूर्ण टाकी परत स्वच्छ करावी लागते. त्यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होऊ शकते. ई ८५ इंधन यशस्वी करण्यासाठी पुरवठा साखळी पासून पेट्रोल पंपापर्यंत अत्यंत चोख व्यवस्था करावी लागेल. बाजारात ई ८५ पेट्रोलवर चालणारी योग्य वाहने मोठ्या प्रमाणात येणे गरजेचे आहे. सरकारचा हा निर्णय पर्यावरण आणि खिशाच्या दृष्टीने चांगला वाटत असला तरी योग्य पायाभूत सुविधा अभावी पेट्रोल पंप चालकांची डोकेदुखी आणि ग्राहकांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे.

## अकोट शहरचे नवे ठाणेदार जुनघरे

प्रतिनिधी ११ जून

**अकोट :** जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशाने पोलिस निरिक्षकांच्या बदल्या नुकत्याच करण्यात आल्या आहेत. यामध्ये अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनला कार्यरत असलेले ठाणेदार किशोर जुनघरे यांची बदली अकोट शहर पोलिस स्टेशनला प्रभारी अधिकारी म्हणून करण्यात आली आहे. तर अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनला मुर्तीजापूर ग्रामीण पोलिस स्टेशनमधील श्रीधर गुठे रूजू होणार आहेत. अकोट शहर पोलिस स्टेशनला ठाणेदार असलेले अमोल माळवे यांना अकोला येथे सायबर विभागाचे प्रभारी अधिकारी म्हणून पाठविण्यात आले आहे.

# शेतीचे साहित्य चोरणारे चोरटे जेरबंद !

प्रतिनिधी ११ जून



**अमरावती :** शेतात जाऊन शेतीतील ६० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरणाऱ्या आरोपींना अखेर ग्रामीण पोलिसांनी गजाआड केले आहे.

फिर्यादी दामोदर अण्णाजी पवार (६६) रा. बोरखडी बुद्रुक हे विहीर खोदण्याचे व बांधण्याचे काम करतात. त्यांनी बोरखडी खुर्द येथील सुरज शरदराव राऊत यांच्या शेतात विहीर खोदण्याचे काम घेतले होते. त्यांनी ५ जून रोजी काम बंद करून आपले साहित्य शेतात ठेवले होते. ८ जून रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास ते शेतात गेले असता त्यांना साहित्य चोरीला गेल्याचे समजले. यामध्ये २० नग लोखंडी तराफे किंमत ४० हजार व २ नग सिमेंट माल कालवण्याचे लोखंडी टप किंमत २० हजार रूपये, असा ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी खोलापूर पोलीस ठाण्यात कलम ३०३(२)बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी सखोल तपास करीत आरोपींना अटक केली. गुप्त बातमीदाराकडून माहिती काढून बोरखडी (बु.) येथील संशयितांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी सुरज राऊत यांच्या शेतातून चोरीकेलेले साहित्य टाटा २०७ (क्र. एमएच ०४ एफपी०५२०) या वाहनात भरून खोलापूर येथील भंगार बाजारात विकल्याचे कबूल केले. अटक केलेल्या आरोपींमध्ये अनिल रामचंद सोळंके, दिवाकर सुरेश सोळंके, प्रशांत नामदेवराव चव्हाण रा. बोरखडी व भंगार व्यावसायिक उमर खान साहेब खान आणि अमीन खान बने खान दोघेही रा. गलपुरा, खोलापूर तसेच वाहन चालक प्रथमेश संजय कुंभेकर रा. इस्तलापूर आदींचा समावेश असून, त्यांना अटक करण्यात आली.

# युवकावर प्राणघातक हल्ला, एकाला अटक

प्रतिनिधी ११ जून

**अकोला:** तेल्हारा तालुक्यातील रहिवासी अंकुश बाळकृष्ण खरात (२२) हा जनावरांसाठी चारा आणण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन जात होता. वाटेत दबा धरून बसलेल्या प्रदीप काठोकार आणि त्याच्या पत्नीने त्याला अडवून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दरम्यान, प्रदीपच्या साथीदारांनी अंकुश खरातच्या चेहऱ्यावर मागून कापड टाकून त्याच्यावर जीवघेणा हल्ला केला.

रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांनी या घटनेची माहिती अंकुशच्या कुटुंबाला दिली. अंकुशचा भाऊ अर्जुन याने तातडीने तेल्हारा पोलीस ठाण्यात पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर अंकुशला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. डोक्याला गंभीर दुखापत आणि पाय फॅक्चर झाल्यामुळे त्याची प्रकृती चिंताजनक झाली होती. डॉक्टरांनी अंकुशच्या कुटुंबीयांना त्याला नागपूरच्या रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. जखमी अंकुश कोमात गेल्यामुळे त्याची प्रकृती अत्यंत खालावली होती. अखेर छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील एका खाजगी रुग्णालयात जखमी अंकुशला दाखल करण्यात आले.

अंकुशच्या भावाने पोलिसांत तक्रार दाखल केली होती, ज्यावरून कलम ३२६ अंतर्गत एका आरोपीला अटक करण्यात आली होती.

## ट्रॅक्टर ट्रॉलिला रेडियम लावण्याचे आवाहन

प्रतिनिधी ११ जून

**अकोला:** कास्तकारांचे ट्रॅक्टर ट्रॉली आदी - वाहने कृषी विषयक कामकाज करीत असताना दिवस रात्र रस्त्यावरून धावत असतात. मात्र अश्यावेळी समोरून येणाऱ्या वाहनांची रेडियम अभावी अशा ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रेलरला धडक लागून अपघात व साहित्याची जबर हानी होत असते. म्हणून संबंधित विभागाने कास्तकारांच्या बर ट्रॅक्टर ट्रॉली आदी रस्त्यावरून ये जा करणाऱ्या कृषीविषयक वाहनांना रेडियम लावण्याची मागणी अकोला डिस्ट्रिक्ट ट्रक ओनर वेल्फेअर असोसिएशनच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सदर मागणी केली आहे. पावसाळा सुरू होत असून शेतीची मशागतीची कामे जोमाने सुरू आहेत. रात्री बेरात्री कृषीविषयक वाहनांची रस्त्यावर वर्दळ सुरू असते. समोरून वा पाठीमागून येणाऱ्या अन्य वाहनांना अशी वाहने दिसत नसल्यामुळे छोटे-मोठे अपघात सातत्याने घडून कृषीविषयक साहित्याचे मोठे नुकसान कास्तकारांचे होते.

## निष्क्रिय वीजतारा हटविण्याची रहिवाशांची मागणी

प्रतिनिधी ११ जून

**अकोट, :** शहरातील गजानन नगर, हनुमान प्रभाग क्रमांक ७ मधील रहिवाशांनी त्यांच्या घरांवरून गेलेल्या बंद व निष्क्रिय वीजतारा तातडीने काढून टाकाव्यात, अशी मागणी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही रहिवाशांनी दिला आहे.

रहिवाशांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परिसरातील अनेक घरांवरून महावितरणच्या वीज वाहक तारा गेल्या आहेत. मात्र या तारा सध्या पूर्णपणे बंद असून त्याद्वारे कोणताही विद्युत पुरवठा होत नाही. तरीही या निष्क्रिय तारा घरांवरून लोंबकळत असल्याने भविष्यात अपघात किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

# शहरातील सिग्नलवर आता टायमर ! वाहतूक नियम पाळण्याचे 'दखल'चे आवाहन

प्रतिनिधी ११ जून



**अकोला :** शहरातील वाहतूक कोंडी आणि सिग्नल तोडण्याच्या घटनांवर उपाय म्हणून 'दखल' या सामाजिक संस्थेच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. दखल संस्थेने अकोला जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत सिग्नलवर टायमर बसवण्याची महत्त्वपूर्ण सूचना मांडली होती. त्याचा पाठपुरावा केल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात परिवहन कार्यालयामार्फत १७.२० लाख रुपयांचा निधी महानगरपालिकेला उपलब्ध करून देण्यात आला होता. शहरातील बहुतांश सिग्नलवर वेळ दर्शक यंत्रणा नसल्याने नागरिकांना सिग्नल किती वेळाने सुटेल हे कळत नव्हते. त्यामुळे अनेक नागरिक घाईत सिग्नल तोडून जात होते. यामुळे अपघातांची शक्यता वाढली होती. 'दखल' संस्थेने रस्ता सुरक्षा समितीमध्ये टायमरची सूचना मांडून पाठपुरावा केला. फेब्रुवारी २०२६ मध्ये परिवहन विभागाने १७.२० लाखांचा निधी महानगरपालिकेला दिला.

आता शहरातील मुख्य सिग्नलवर टायमर यंत्रणा हळूहळू बसवण्याचे काम सुरू आहे. टायमरमुळे वाहनचालकांना सिग्नलची अचूक वेळ कळत असल्याने सिग्नल तोडण्याच्या घटना कमी होतील, असा विश्वास आहे. टायमर असला तरीही लाल दिवा लागल्यावर १ सेकंदही पुढे जाऊ नका. १ सेकंदाची घाई जीवावर बेतू शकते, पिवळा दिवा म्हणजे 'सावध व्हा', 'वेग वाढवू नका'. ब्रेकवर पाय ठेवा, सिग्नलवर थांबताना झेब्रा पट्ट्याआधीच वाहन थांबवा. पादचाऱ्यांना रस्ता द्या, सिग्नलवर थांबले असताना मोबाईलवर बोलणे/रिल पाहणे टाळा. हिरवा दिवा लागला तरी लगेच निघू नका, उजवा-डावा बघा, सिग्नल पाळण्याबरोबरच दुचाकीस्वारांनी हेल्मेट आणि चारचाकीतील लोकांनी सीटबेल्ट सक्तीने वापरा. दखल संस्थेने नागरिकांना आवाहन केले आहे की, शासन-प्रशासनाकडून सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत, पण त्या यशस्वी होण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे.

## वन विभागाच्या बुलढाणा भरारी पथकाकडून खामगावात साडेतीन लाखांचे लाकूड व जळतन जप्त...!

प्रतिनिधी ११ जून



**खामगाव:** वन विभागाच्या बुलढाणा भरारी पथकाने खामगाव शहरात मोठी कारवाई करत बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेले लाकूड व जळतन जप्त केले. या कारवाईदरम्यान बर्डे प्लॉट व सजनपुरी भागात एकूण नऊ ठिकाणी छापे टाकण्यात आले असून ३ लाख ७९ हजार ६२९ रुपये किमतीचे लाकूड व जळतन जप्त करण्यात आले आहे. भरारी पथक प्रमुख यु. आर. राऊत यांनी ही माहिती दिली. वन विभागाला बेकायदेशीर लाकूड साठवणुकीबाबत माहिती मिळाल्यानंतर विशेष पथकाने खामगावातील बर्डे प्लॉट व सजनपुरी परिसरात एकाच वेळी छापेमारी केली.

## निंबा फाटा ते मनसगाव मार्गावरील झाडे रात्रीच्या वेळी पेटविण्याचा प्रकार उघड



प्रतिनिधी ११ जून

**हातरूण:** निंबा फाटा ते मनसगाव मार्गालगत रस्त्याच्या दुतर्फा अनेक झाडे रात्रीच्या वेळी पेटविण्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. झाडाला खालुन कु-हाडीने छाटुन आग लावली जात आहे. या प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व वनविभाग दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. अनेक दिवसापासून रस्त्याच्या दुतर्फा झाडांना जाणीवपूर्वक आग लावली जात असल्याचे चित्र आहे. हा गंभीर प्रकार लोकानां दिसतो पण संबंधित अधिकारी का दुर्लक्ष करतात ही खरी समस्या आहे.

आतापर्यंत मार्गावरील अनेक हिरवेगार वृक्ष जळून खाक झाले. बुंध्यापासून जाळलेली झाडे मशीन द्वारे कापून नेतात. हा प्रकार थांबवा अशी मागणी आहे.

# हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांविरुध्द सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करा !

### मृतकांच्या पतीसह शिवसेना (उबाठा) ची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

प्रतिनिधी ११ जून

**मलकापूर :** गत महिन्यात उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान १७ मे २६ रोजी रात्री ११ वाजता गायत्री दिनेश चांदेलकर रा.सावरगव नेहू ता.नांदुरा व भारती आकाश सोनोने रा. कुंड बु. ता. मलकापूर या दोघींचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला आहे. त्यामुळे डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून कायमचे बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून मृतकाचा पती दिनेश देविदास चांदेलकर व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांच्याकडे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्यामुळे माझी पत्नी गायत्री चांदेलकर व कुंड बु येथील महिला असा दोघींचा दुर्दैवी मृत्यू प्रसूतीदरम्यान झाला होता. सदर डॉक्टर वर सदोष मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करून संबंधित डॉक्टरांना सेवेतून कायमचे बडतर्फ करण्यात यावे जेणेकरून त्यांच्या हातून यापुढे कोणतीही जीवित हानी होणार नाही. सदर डॉक्टरवर कायदेशीर कारवाई न केल्यास २९ जूनपासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण बसेल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदन देतेवेळी मृतक महिलाचा पती दिनेश देविदास चांदेलकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, विभागप्रमुख सत्तार शाह, रफीकभाई पजायेवाले, युवा सेना उपतालुकाप्रमुख अमीत राजपूत आदींची उपस्थिती होती.

## देवदर्शनासाठी घर सोडले अन् चोरट्यांनी साधला डाव !

### दोन लाखांच्या रोख रक्कमेसह दागिने लंपास

प्रतिनिधी ११ जून

**खामगाव:** देवदर्शनासाठी गेलेल्या शेतकरी महिलेच्या बंद घरात अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा तब्बल २ लाख ४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना जलंब येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी ९ जून रोजी जलंब पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी सोनाबाई हरपालसिंग राजपूत (३६) या ९ जून रोजी देवदर्शनासाठी वारी हनुमान येथे गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप उघडून आत प्रवेश केला. घरातील बेडरूममध्ये ठेवलेल्या लाकडी कपाटाची झडती घेत सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम पळवून नेण्यात आली. चोरीस गेलेल्या मालामध्ये अंदाजे ४० ग्रॅम वजनाची सोन्याची गहूपोत, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची कानातले आणि १ लाख ५० हजार रुपयांची रोकड यांचा समावेश आहे. एकूण चोरीचा ऐवज २ लाख ४ हजार रुपयांचा असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर राजपूत यांनी जलंब पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. त्यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३३१(४) व ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक दत्ता नरवाडे करीत आहे.

# वृध्दासाठी जिल्हाधिकारी यांनी दिला मदतीचा हात



प्रतिनिधी ११ जून

**अकोला :** स्ट्रेचर नसल्याने पतीला पाठीवर घेऊन उपचारासाठी वणवण फिरणाऱ्या महिलेचा व्हायरल व्हिडिओ सर्वांनीचं पाहिला. मात्र, आता दुसरा व्हिडिओ समोर आला आहे. वृद्ध पतीच्या उपचारासाठी मदत मागणाऱ्या महिलेच्या मदतीला थेट जिल्हाधिकाऱ्यांनी हात दिला आहे. व्हिडिओमध्ये दिसणार हे वृद्ध दांपत्य. दोघेही जिल्हाधिकारी कार्यलयाच्या पायऱ्यावर बसून होते. 'माझा नवरा आजारी आहे, थोडी मदत कराल... रुग्णालयात न्यायचं यांना... अशी विनवणी वृद्ध महिलेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी कार्यालयातच ॲम्बुलन्स बोलावली. अंगरक्षक, पोलिस आणि कर्मचाऱ्यांकडून वृद्ध व्यक्तीला उपचारार्थ रवाना केले. हे वृद्ध दांपत्य बेघर असून गेल्या कित्येक दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात राहत आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK